# चैतन्य लहरी

मार्च - एप्रिल २००३
अंक क्र. ३,४







शिवरात्री पूजा, प्रतिष्ठान
पुणे

शिव पूजा, बालेवाडी
पुणे





# अनुक्रमणिका


गुढी उभारु सहजाची ........ २
श्री शिव पूजा पुणे ,१६ मार्च २००३ ........ ३
वाढदिवस पूजा दिल्ली, २१ मार्च २००३ ........ ६
शिवरात्रीपूजा प्रतिष्ठान पुणे,१ मार्च २००३ ........ ९
शिवपूजा पुणे२००३, वृत्तांत ........ ११
५६ वा लग्नाचा वाढदिवस समारंभ: वृत्तांत व वाढदिवस प्रसंगी
श्रीमाताजी व सर श्री सी.पी.श्रीवास्तव साहेबांचे भाषण ........ १४
आदिशक्तीची शक्तिपीठे ........ १६
वाढदिवस सोहळा, १८ - २१ मार्च २००३ दिल्ली: वृत्तांत ........ १९
आज्ञा चक्र ........ २१
तानसेन ........ २३
सहज समाचार ........ २४


चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्व्हे नंबर ९८, भुसारी कॉलनी , कोथरुड, पुणे -४११ ०३८
टेलिफोन : ०२०-५२८६१०५, ५२८ ०६६८ इमेल : chaitanyalaharipune@rediffmail.com

## गुढी उभारू सहजाची

गुढीपाडवा नुकताच साजरा झाला व घरोघरी गुढी उभारुन नववर्षाचे स्वागत झाले. गुढी हे मांगल्याचे, यशाचे, आनंदाचे व कल्याणाचे प्रतीक आहे हे भारतीय संस्कृतीमधें मानले जाते. श्रीराम महाभयंकर राम-रावण युध्दात रावणाचा संहार करुन अयोध्येला परत आले तेव्हा अयोध्या नगरीत गुढ्या- तोरणे उभारुन प्रजाजनांनी त्यांचे स्वागत केले व त्यांचा विजय साजरा केला. शालिवाहन वंशातही गुढी उभारण्याची प्रथा होती व त्यासाठींच शालिवाहन संवत्सर सुरु केले.

सहजयोगाची मुहुर्तमेढ होऊन आतां जवळ जवळ तीन तपांचा काळ होत आहे. सहजयोग आतां खूप ठिकाणीं जगभर पसरला आहे. पण त्याचबरोबर जगभरातील समस्याही घौडदौडीने वाढत आहेत. स्पर्धा-चढाओढ, स्वार्थ, संघर्ष, हेवे-दावे, आर्थिक आक्रमकता इ. अनेक दुष्प्र वृत्तींमुळें वातावरण गढूळ झाले आहे. मानवाच्या अंतरंगातील हे प्रदूषण थोपवण्यास सहजयोगाशिवाय तरणोपाय नाहीं. आत्म्याचा प्रकाश माणसांमध्ये जागृत व पेटता झाल्याशिवाय हा अंध:कार संपणार नाहीं. या तळमळीपोटी प.पू. श्रीमाताजी या वयातही इतके कष्ट घेत आहेत. म्हणूनच सध्याचा काळ फार निकडीचा आहे; आणि म्हणूनच कुंडलिनी - जागृतीचे कार्य करण्याचा एकमेव संदेश समस्त सहजयोग्यांना त्या वारंवार देत आहेत. आपण सर्वांनी त्यामागची समस्त मानवजातीच्या उध्दाराची श्रीमाताजींची तळमळ जाणीवपूर्वक ओळखून सहजयोगाच्या प्रचार व प्रसाराच्या कार्याला वाहून घेतले पाहिजे. त्यातूनच सहजयोग सर्वत्र संचारणार आहे.

नववर्षाच्या शुभमुहुर्तावर आपण सर्वांनी घरोघरी सहजयोगाची गुढी उभारण्याची प्रतिज्ञा करुं या. त्यातूनच सर्वत्र आनंद व शांति पसरणार आहे व तोच सहजयोगाचा विजयोत्सव होणार आहे. प.पू. श्रीमाताजींना प्रसन्नता देणारी याहून दुसरी कुठलीच गोष्ट नाही हे भान आपण जाणीवपूर्वक जोपासण्याचा व तळमळीनें, निष्ठापूर्वक कार्य करण्याचा हाच समय आहे.



# श्री शिव पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण
पुणे, १६ मार्च २००३

सदैव क्षमा करत रहाणे व क्रोधावर संयम बाळगणे हेच सहजयोग्यांना भूषणास्पद आहे.

आज आपण श्रीशिवांची, अर्थात श्रीसदाशिवांची पूजा करणार आहोत. श्रीशिव म्हणजे मूर्तिमंत क्षमाशक्ति, त्यांची ही क्षमाशक्ति इतकी अमाप आहे की तिच्या आधारावरच आपण अजून जिवंत आहोत; नाहींतर ही सारी सृष्टि केव्हाच नाहींशी झाली असती. माणसांची आजची स्थिती काय आहे तुम्ही जाणताच; त्यांच्या आधाराशिवाय कित्येक जण लयाला गेले असते. माणसांना योग्य काय, अयोग्य काय हेच समजेनासे झाले आहे; शिवाय त्यांच्याजवळ क्षमाशक्तीही उरली नाहीं; स्वत: कितीही चुका करतील पण दुसऱ्यांना त्यांच्या चुकांची क्षमा करणार नाहीं. श्रीसदाशिवांपासून हाच बोध आपल्याला घ्यायचा आहे.

क्षमाशीलता हा शिवांचा खास स्वभावच आहे; माणूस त्यांच्या क्षमाशीलतेची कल्पनाही करण्यास असमर्थ आहे. आपल्या कसल्याही चुकांची ते क्षमा करतात; तसे नसते तर सबंध जगाचा केव्हांच नायनाट झाला असता, कारण त्यांच्याजवळ सारी सृष्टि नष्ट करण्याचीही शक्ति आहे. इतके क्षमाशील असूनही त्यांची ही संहारशक्ति जागृत आहे व कार्यान्वितही आहे. त्यांच्याजवळ या दोन्ही शक्त्या आहेत; एका बाजूनें ते क्षमा करतील तर दुसऱ्या बाजूनें संहारही करतील.

म्हणून आपण सर्वप्रथम त्यांच्या सारखे क्षमाशील बनले पाहिजे. आपण सदैव दुसऱ्यांवर रागावत राहतो, छोट्या-छोट्या गोष्टींवरुनही वादविवाद व भांडणे करत राहतो; पण क्षमा करण्याचा विचारही करत नाहीं. श्रीशिव सुरवातीला क्षमा करतातच; पण त्यालाही मर्यादा असते आणि अपराधांनी परिसीमा गाठली म्हणजे त्यांची संहारशक्ति जागृत होते. या संहारशक्तिमधून समस्त ब्रम्हांड ते नष्ट करुं शकतात; साऱ्या सृष्टीचा नायनाट करायला त्यांना वेळ लागत नाहीं. म्हणून आपण हे नीट लक्षांत घेतले पाहिजे की आपण आधीं अत्यंत क्षमाशील बनले पाहिजे; तो क्षमागुण आपण मिळवला नाहीं तर आपली प्रवृत्तीही विध्वंसाकडे वळते; आणि आपल्याच भाऊबंदाचा आपण नाश करुं लागतो. त्यासाठी सदैव सतर्क व सावधान राहून आपण उगीचच दुसऱ्यांवर नाराज तर होत नाहीं ना याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत दुसऱ्याला जिवे मारण्याचा अधिकार मानवाला नाहीं. श्रीशिव जर नाराज होत नाहीत तर आपल्यालाही इतरांवर नाराज होण्याचा काय अधिकार आहे? पण माणसामधें दुसऱ्याबद्दलची नाराजी ठेवण्याची घातक संवय आहे. पशुसुध्दां कांहीं विशेष कारण नसेल तर शत्रुत्व ठेवत नाहींत. म्हणून आपण हें समजून घेतले पाहिजे की ऊठसूट झगडे- तंटे करत राहिलो तर हीच संहारशक्ति प्रगट होंऊ शकते. दुसऱ्यांना क्षमा करण्याऐवजी त्यांच्याबरोबर भांडणतंटेच करत राहणारा माणूस कुठल्या टोकाला जाईल ते सांगता येणार नाहीं.

जगामधें जेव्हां जेव्हां युध्द पेटले, भांडणाचा कडेलोट झाला, संकटे आली तेव्हां हेच दिसून आले की त्यामागे मानवजात नाहींशी करण्याचीच प्रवृत्ति होती. ही संहारशक्ति मुळापासूनच असते आणि त्यामुळें माणूस माणसावरच उलटत असतो. हे सगळीकडे घडत आले आहे. हे का व कसे होतें याचा विचार करण्याची जरुरी नाहीं. पण त्याचबरोबर आपण इतक्या क्षुद्र व खालच्या स्तराला जाणें योग्य नाहीं हे जर आपण नीट



समाजांत क्रोध उफाळून येतो तेव्हां मला फार दु:ख होते. छोट्या-मोठ्या कारणावरूनही ऊठसूठ रागवणे वा ओरडणें अगदी चुकीचे आहे आणि हीच भावना जर सामूहिक स्तरावर पसरली तर जाळपोळ, विध्वंस, युध्द, घरादारांचा नाश इ.अनर्थ पैदा होतात. जेवढे मी हे बघत राहते तेवढे हे अनिष्ट प्रकार वाढतच आहेत. मला फार राग येतो असे गौरवपूर्वक सांगणारेही असतात.म्हणून श्रीशिवशंकरांची पूजा करणाऱ्यांनी हे लक्षांत ठेवले पाहिजे की ते क्षमेचे मूर्तिमंत स्वरुप आहेत; ते सदैव सर्वांना क्षमा करत असतात. स्वत:च्या मुलांना आपण क्षमा करतो तसे ते सर्वांना क्षमा करत असतात त्यांना कधीं राग येत नाहीं. तसेच ते सहसा विचलित होत नाहींत. याशिवाय प्रत्येक माणसाचे कांहीं पूर्वग्रह असतात. उदा. महिलांनी जास्त बोललेले कुणाला आवडत नाही; पुरुषाने बडबड केलेली चालते पण स्त्रीने तसे केलेले खपत नाहीं; तसेच बाईनें पुरुषावर हात उगारणे पण चुकीचे मानतात. हीसुध्दां घातक व समाजाला नुकसानकारक अशी समजूत आहे. परदेशांतही मी पाहते की पत्नीला मारहाण करणारे, तिला ठार मारणारे नवरे असतात. लग्नाची पत्नी म्हणजे तिच्या बाबतीत आपल्याला पूर्ण आधिकार आहे, तिने चुका करता कामा नये अशीच जणूं समजूत असते. तोच प्रकार शाळेतील शिक्षकांचा; ते मुलांना फार वाईट तऱ्हेने वागवतात. तीच प्रवृत्ति मोठे झाल्यावर मुलांमध्ये येते. स्वभावातील हा रागीटपणा हा फार मोठा दोष आहे. राग आला तर आधीं स्वत:ला बजावा की 'मी रागवणे चूक आहे 'मी अनेक वेळां तुमच्यापैकी पुष्कळजणांना सांगितले आहे की स्वत:च्या रागीटपणाचा अभिमान दाखवूं नका. सहजयोग्यांना हे शोभत नाहीं.मूर्ख माणसानें किंवा दारुड्यानें शिव्या दिल्यासारखे रागावून बोलणें हे फार चुकीचे व नुकसानकारक आहे. हा स्वभावांतील रागीटपणा कुठून येतो हे सांगणे अवघड आहे. संत लोक असे नसतात; कांहीही झाले तरी ते संतापत नाहींत किंवा संयम सोडत नाहींत. त्यांना जगामधें सर्वांना सांभाळून घ्यायचे असते व जगामधे शांति निर्माण करायची असते.

कधी कधी मी पाहते की माणसे जनावरांपेक्षाही वाईट तऱ्हेने वागतात; त्यांना राग आवरता येत नाहीं; क्रोधाची अनेक कारणे कारणे सांगता येतील पण तरीही त्यांचे समर्थन करणे चूकच आहे. तुम्ही शांतीचा आनंद मिळवण्यासाठीं इथें आला आहात. आजूबाजूला शांति निर्माण केली नाहींत तर तुम्हांला आनंद कसा सापडणार? सगळीकडे अशांतता पसरवणारे, वाईट व्यवहार करणारे लोक स्वत:ला कोण समजतात कोण जाणे. छोट्या-छोट्या निमित्ताने व क्षुल्लक गोष्टींवरुन समजून घेतले तर सगळीकडे शांतता नांदू लागेल. आपण स्वत: शांत राहण्यास शिकलो तर जीवनातही शांति निर्माण होईल. पण माणूसच आपल्यावर ताबा कसा ठेवणार हा प्रश्न व अडचण आहे. दुसऱ्यांना शिक्षा करण्यांत व शासन देण्यांत धन्यता मानणे हा माणसाचा स्वभावगुणच आहे काय समजत नाहीं. देशा-देशांमधेही हाच प्रकार आहे, वैरभावना आहे; देशांतील एक माणूस जरी असा वागूं लागला की सगळेच जण त्याच्यामागें उभे राहतात. मग मानव-उध्दारासाठीं कोण राहणार? मारपीट करण्यासाठीं अनेक लोक तत्पर असतात. एखादा जरी उध्दार कार्याला तळमळीनें लागला तर फक्त बघे लोक जमतात; पण हातांत शस्त्र घेऊन मारपीट करणाऱ्याकडून आपणही शस्त्र मागून त्याच्यासारखे वागायला लगेच तयार. माणसाची तबियतच अशी असावी; नाहींतर दुसऱ्यावर राग काढण्यांत, त्रास देऊन तंग करण्यांत काय सुख मिळणार आहे हा विचार तरी त्याला सुचला असता. रस्त्यांत जरा कुठें जरा भांडण तंटा झाला की गर्दी जमते.

माणसामधील ही वाईट प्रवृत्ति दूर करणारी एकमेव शक्ति म्हणजे शिवशक्ति. हृदयापासून शिवांचा आदर ठेऊन त्यांची आराधना केली तर माणसामधील क्रोध नाहींसा होईल. श्रीकृष्णांनीही क्रोध हाच माणसाचा मोठा दुर्गुण आहे असे सांगितले आहे. आपल्याकडेही

संयम सुटणें फार चुकीचे आहे. पण तसे पाहिले तर हा एक प्रकारचा भ्याडपणा आहे व असे लोक खरोखर अडचणीत वा संकटात आले तर पायात शेपूट घालणारे असतात.

आपल्याकडेही असे रागीट व संतापी लोक असतात आणि त्यांच्यापासून आपणही चार हात दूर राहणें चांगले. कुणी कांही चूक केलीच तर त्याला माफी केलेली बरी; उदा. समजा तुम्ही अशी चूक केली तर कुणाला शिक्षा करणार? सहाजयोग्यांना कुणावर रागावण्याचा किंवा दुसऱ्यांना त्यांच्या चुकांची शिक्षा देण्याचा मुळींच अधिकार नाहीं. शिवजींना जे मानतात, शिवजींसारखा ज्यांचा स्वभाव आहे तेच खरे पार झाले म्हणायचे, आणि त्यांचे संरक्षणही शिव करत राहतात. शांत, क्षमाशील व सज्जन स्वभावाच्या योग्याला कसली चिंता करण्याचे कारणच नाहीं; त्याच्याकडे लक्ष देणारे व सांभाळणारे श्री शिवशंकरच आहेत. म्हणून नाराज होणें, रागावणें हे सोडून द्या. दुसऱ्यांनी चांगलेच वागले पाहिजे, चुका करता कामा नये ही सवय व प्रवृत्ति विसरा. दुसऱ्यांना माफ करणे दूरच पण त्यांचा सर्वनाश व्हावा ही वासना बाळगणेही चुकीचे आहे.

जोपर्यंत माणसाला आत्मसाक्षात्कार होत नाहीं तोपर्यंत तो स्वत:ला नीट ओळखूं शकत नाहीं; आपण पशू नसून मनुष्य आहोत याची विशेषत:ही त्याला समजत नाहीं. जनावरेसुध्दा उगीचच कधीं नाराज होत नाहींत, कारण त्यांचा शिव सांभाळ करत असतात. माणसाचा हा दुर्गुण फार अपायकारक आहे व त्यामुळें त्याच्यामधील शिवशक्ति नष्ट होत जाते. मग हिटलरसारखे हजारो लोकांना ठार मारणारे पैदा होतात. त्यांतून अनेक संसार नष्ट झाले व देश बिकट स्थितीला आला. असे महावीर निर्माण होतच राहणार; पण त्यांचे तुम्ही अनुकरण करुं नका.

तुम्ही सहजयोगी आहांत म्हणून तुम्ही सदैव क्षमा करत रहा. क्षमाशीलता हा सज्जनांचा मोठा गुण आहे व ती फार मोठी शक्ति आहे.म्हणूनच शिवशंकरांना देवांचे देव,महादेव, असे मानले आहे. त्यांना स्वत:ला कांहीही जरुरी नसते; कपडेही नसून भस्म लावून राहतात. पण जे कोणी दुसऱ्यांवर जबरदस्ती करुन त्यांना छळतात त्यांना तेच शिक्षा देतात व त्यांचा नायनाट करतात. त्यांची क्षमाशक्ति जितकी अमाप आहे तेवढीच संहारशक्ति प्रचंड आहे. म्हणूनच माणसांनी त्यांना ओळखले पाहिजें; एरवी माणसाची धडगत नाहीं. जगांमधे राक्षसप्रवृत्तीचे अनेक रथी - महारथी होते पण शेवटी त्यांचे काय झाले? त्यांचे नामोनिशाणही मागे उरले नाहीं.

सहजयोग्यांनी हे लक्षांत ठेवले पाहिजे की ते रागावले, नाराज झाले तर लोक फार तर त्यांना वचकून राहतील, घाबरुन त्यांची कामे करतील पण त्याचा काय फायदा? तुम्ही किती लोक जोडले याला महत्व आहे; किती लोकांशी भांडलात याला किंमत नाहीं. कांहींजणांना ऊठबस, तंटा- झगडा - वाद करण्याची संवयच असते. त्यांना तोंडावर लोक मान देतील कदाचित पण त्यांच्याबद्दल कुणाला प्रेम वाटणार नाहीं. सहजयोग प्रेमाचा सागर आहे. राग बाळगणें, रागावणे वा नाराज होणे याला अर्थ नाहीं. येशू ख्रिस्तांकडे पहा, त्यांना सुळावर चढविणाऱ्यांनाही क्षमा करण्याची प्रार्थना त्यांनी देवाजवळ केली. सहजयोग्यांमधें जेव्हां ही क्षमाशीलता येते तेव्हां ते समर्थ शक्तिशाली बनतात, त्यांना शिवांचे गुण प्राप्त होतात, श्रीशिवाचे त्यांना आशीर्वाद मिळतात. म्हणून आजच्या पूजेच्या दिवशी हे सर्व विचारपूर्वक ध्यानांत घ्या. आपल्या देशांत कांही लोकांनी जे मारामारी व लुटालुटीचे अनिष्ठ प्रकार चालवले आहेत त्यात सहजयोग्यांनी अडकून घेऊ नये. त्या भानगडींत कांही अर्थ नाहीं.

आजच्या शिवपूजेच्या दिवशीं तुम्ही सर्वजण संकल्प करा की आम्ही रागाची भावना ठेवणार नाहीं, कुठल्याही परिस्थितीत क्रोधावर संयम राखू. हृदयापासून श्रीशिवांना या पूजेमधून प्रसन्न करा व त्यांचे गुण आत्मसात करा.

सर्वांना अनंत आशीर्वाद.





# वाढदिवस पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण
निर्मल-धाम, दिल्ली, २१ मार्च २००३

**चुकलेल्या मार्गाकडे चाललेल्या समस्त मानवजातीला वाचवण्यासाठीच सहजयोग आहे व ते कार्य सहजयोग्यांनी निष्ठेने केलेच पाहिजे.**

इथें बरेचजण परदेशांतील लोक असल्यामुळें सर्वजण इंग्रजीमधून बोलत होते. आज मी तुमच्याबरोबर मानवी जीवनाबद्दल बोलणार आहे.हे जीवन सतत प्रवाही असते, तुमच्या वयाशी त्याचा संबंध नसतो; पण सहजयोगामधून तुमच्यामध्यें जो प्रकाश आला आहे त्याचा तुम्ही कसा उपयोग करता हेच महत्त्वाचे आहे. तुम्ही कुण्डलिनी जागृत झाल्यामुळे आत्मप्रकाशांत आलेला आहांत; तुम्हाला तिची सर्व माहिती आहे; पण तरीही तुम्ही मानवजातीच्या उध्दारासाठीं कसे व किती प्रयत्नशील आहांत हीच एकमेव प्राधान्यक्रमाची गोष्ट आहे. लोकांबद्दल चुका दाखवून त्यांची अवेहलना करण्यापेक्षा त्यांना उन्नतीच्या उच्च स्तरावर आणणें हेच तुमचे कर्तव्य आहे; तरच त्यांना आत्मसन्मान समजेल व आत्मसाक्षात्कार मिळण्यामधील भाग्य लक्षांत येईल.

ही फार महत्वाची गोष्ट आहे. मला बरेच सहजयोगी दुसऱ्यांबद्दल टीका करताना आढळतात. आपल्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्यावर इतरांनाही तो मिळवून देणे हेच आपले कर्तव्य आहे याचा त्यांना विसर पडतो. हे समजले तरच तुमचे राजकीय, अर्थिक असे सर्व प्रश्न सुटणार आहेत. ह्या प्रकारचे प्रश्न आपले मनच अपरिपक्व असल्यामुळे निर्माण करत असते. पण हेच मन परिपक्व झाले की तुमचे प्रश्नच संपतात आणि मग तुम्हाला दुसऱ्यांच्या कल्याणाबद्दल आस्था वाटू लागते. हे मला सांगण्याची जरुर नाहीं इतके हे स्वत:मधील परिवर्तन तुमचे तुम्हालाच समजून येते. हीच सर्वात महत्वाची गोष्ट आहे हे लक्षांत घ्या. तुमच्यापैकी बरेच जण व्यवसाय, उद्योग, राजकारण इ. क्षेत्रात मग्न व यशस्वीही आहांत. पण दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार मिळवून देण्याइतकी समाधानकारक दुसरी गोष्ट नाहीं. सहजयोगांत इतक्या मोठ्या संख्येने लोक येत आहेत ही फार आनंददायक गोष्ट आहे, सहजयोग इतक्या मोठ्या प्रमाणावर पसरेल याची खरे तर मलाही कल्पना नव्हती, पण माझ्याच आयुष्यभरात हे घडून आले आहे ह्याचे मला फार-फार समाधान आहे. दूर - दूरच्या देशांमधेही सहजयोग आता पसरत आहे व वाढतही आहे; अधिकाधिक जनता सहजयोगांत उतरत आहे. आता कांही लोक आपल्या देशांतच कार्य न करता बाहेरच्या प्रांतांमधे जाऊन सहजयोगाचा प्रसार करत आहेत. मी स्वत: आजकाल सगळीकडे जाऊं शकत नसले तरी सहजयोग वेगाने पसरत आहे हे सर्व पाहून मला किती आनंद होत आहे याची तुम्हा लोकांना कल्पना येणार नाहीं. त्यातल्या त्यात ४३ देशांमधे तर सहजयोग फारच मोठ्या प्रमाणावर बहारत आहे आणि इतर ठिकाणीही तो जम धरत आहे. हे सर्व तुमच्या प्रयत्नांमुळे घडून आले आहे आणि या अपूर्व चमत्काराचे सारे श्रेय तुमचे आहे. म्हणून भारतामधील व परदेशांतीलही हे महान कार्य करण्याऱ्या सर्व सहजयोग्यांची मी फार अभारी आहे. दुसऱ्यांचे दोष काढून त्यांना कमी लेखण्यापेक्षां त्यांना अध्यात्मिक उन्नतीकडे वळवणें हे फार महान कार्य आहे.त्यांतूनच जगभरांतील प्रश्न तुम्हाला समजतील आणि संपूर्ण मानवजातीमधें परिवर्तन घडून येईल. हे सर्व कुण्डलिनीच्या जागरणामधूनच शक्य होते वह्यांतच तिची महानता आहे; त्यातूनच मानव एका उच्च स्तरावर उन्नत होतो. हे सर्व पूर्वीपासून लिहिलेले आहे पण सहजयोग्यांचे वैशिष्ट्य हेच आहे की त्यांना नवीन लोकांना सहजयोग प्राप्त करुन देण्याची शक्ति मिळाली आहे; त्यांची कुण्डलिनी जागृत करण्याची शक्ती

त्यांच्याजवळ आहे. या शक्तीचा उपयोग सहजयोग्यांनी केलाच पाहिजे. त्यांतूनच जगभरांतील मानवजातीचे कल्याण होणार आहे. माझ्या जीवनकालामधेंच हे घटित होईल का नाहीं हे मला माहित नाहीं पण तुम्ही सहजयोगी हे घडवून आणणार आहांत याची मला खात्री आहे.

तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक आभार व सर्वांना परमेश्वराचे अनंत आशीर्वाद. सर्व सहजयोग्यांनाही माझे अनंत आशीर्वाद.

माझा जन्मदिवस साजरा करण्यासाठी एवढया मोठया संख्येने तुम्ही इथें जमले आहांत याबद्दल तुमचे कसे आभार मानावेत हेच मला समजेनासे झाले आहे. जवळपासचेच नव्हे तर दूर दूरहून इथे इतके लोक उपस्थित असल्याचे पाहून माझे हृदय भरुन आले आहे. माझा जन्मदिवस साजरा करण्यासाठीं तुम्ही एवढे लोक एकत्रित येण्याइतके काय मोठे विशेष कार्य मी केले आहे हा मलाच प्रश्न पडतो. एवढ्या आडवळणावरच्या ठिकाणीही तुम्ही मोठया संख्येने येऊन समारंभाची इतकी भव्य व्यवस्था केली यांतूनच तुमचे हृदय किती विशाल आहे हे मला समजले तरी ते व्यक्त करण्यासाठीं मला शब्दच सुचेनासे झाले आहे. मी खूप भारावून गेली आहे.

आज जगांत सगळीकडे सहजयोग इतक्या वेगाने व सर्व ठिकाणी वणव्यासारखा पसरत आहे यातून हेच दिसून येते की आजच्या काळाची ती निकडीची गरज आहे. म्हणूनच जास्तीत-जास्त लोक सहजयोगाचा स्वीकार करत आहेत. भारतासारख्या देशांत पूर्वीपासूनच अध्यात्मिक संस्कृति असल्यामुळें हे समजू शकते; पण पाश्चात्य देशांमधे तसे वातावरण नसूनही ते लोक सहजयोगी जीवनाचा आनंद प्राप्त करुन घेण्यास उत्सुक होत आहेत हा कालाचाच महिमा व आशीर्वाद म्हटले पाहिजे. तुम्हाला आत्मसाक्षात्काराचा व प्रेमाचा प्रकाश मिळाला आहे हाच या काळाचा चमत्कार आहे. ह्या प्रेमभावनेचा आनंद तुम्ही मिळवू शकाल की नाहीं याची मलाही आजपर्यंत खात्री नव्हती; तुमची अध्यात्मिक स्थिति हा आनंद मिळवून देईल याची मला कल्पना नव्हती. पण आता मला दिसत आहे की प्रेम व अध्यात्मिक उन्नति व आत्मसाक्षात्कार मिळवण्यास तुम्ही सिध्द होताच. हे सर्व इतक्या सुंदर तऱ्हेने घटित झाले आहे हा एक चमत्कारच आहे. तुम्हाला ही आध्यात्मिक शक्ति मिळाली व तिचा तुम्ही चांगला उपयोग करत आहात ह्याची आधीं कल्पनाच नव्हती. सामान्य माणसामधेंच ही शक्ति अंतर्भूत आहे व ती जागृत होऊ शकते व कार्य करु शकते याची त्याला जाणीव नव्हती. सामान्य माणसाच्या आवाक्यांत ही कल्पना असणें अशक्यच आहे. तुम्हा सहजयोग्यांनाही हे तुमचे यश किती महान आहे याची कल्पना आहे की नाहीं हे मलाही समजत नाहीं. पण या तुमच्या कार्यामधूनच जगामधें सर्व परिवर्तन घडून येणार आहे.

आज इराकमध्यें मोठ्या प्रमाणावर युध्द चालूं आहे, त्याचा परिणाम व शेवट काय होणार आहे मला माहित नाहीं. पण आपल्या



सर्वांच्या इच्छाशक्तीचा प्रभाव पडून ते लवकरच संपेल व पुन्हा एकदां सर्वत्र शांतता नांदू लागेल.(टाळ्या)आपल्याला युध्द नको आहेत पण मानवांमधे आंतूनच परिवर्तन घडवून आणायचे आहे. हे तुमच्यासमोर मोठे आव्हान आहे व त्यासाठीं तुम्हाला खुप कष्ट करायला पाहिजेत; जास्तीत - जास्त लोकांना आत्मसाक्षात्कार दिल्याशिवाय ही परिस्थिति बदलणार नाहीं. प्रत्येक माणसाला तो मिळेल असा विचार न करता जेवढया - केवढ्यांना तो मिळवून देता येईल तेवढा प्रयत्न करत रहा. या कलियुगांत जन्माला आलेले मानव असल्यामुळे ते त्याला पात्रच आहेत हे लक्षांत घ्या; त्यांच्यावरोबर संवाद साधा, प्रयत्न सोडू नका आणि आत्मसाक्षात्कार देण्याचे कार्य करत रहा. हे अवघड नाहीं, तुमच्यापैकी प्रत्येक जण ते करु शकतो. प्रत्येकाने दहा-पंधरा जणांना जरी आत्मसाक्षात्कार दिला तरी जगांमधें बदल घडून येईल. हेच आपले ध्येय आहे. मगच एकमेकांबरोबर शांततेत राहण्यांतच शहाणपण आहे हे त्यांना समजेल; देश-वर्ण - जात हे भेदभाव नाहींसे होतील व सर्व मानवप्राणी बंधुभावामधें राहतील. मानव आणि पशू यांत हाच फरक आहे. सर्व समाजांत अध्यात्मिक परिवर्तन घडून आले तर सर्व काहीं सुरळित होणार आहे याची मला खात्री आहे.



म्हणून आज आपण प्रार्थना करु या की सहजयोग जगभर पसरु दे, प्रत्येकाला आत्मसाक्षात्कार मिळू दे. हीच तुम्ही प्रत्येकाने प्रतिज्ञा करा म्हणजे चुकलेल्या मार्गाकडे गेलेली सर्व माणसे सन्मार्गाकडे वळतील. हे घडून आले की सगळीकडे सहजयोगाची शांतता पसरेल.हीच काळाची गरज असल्यामुळें तुम्हाला त्यासाठी अविश्रांत मेहनत घ्यायला हवी; सहजयोग जितका जास्त पसरेल तितकी त्याला चालना मिळणार आहे. त्यासाठी मी तुम्हाला हृदयापासून आशीर्वाद देते, तुम्हाला मिळालेल्या शक्तीचा पुरेपूर उपयोग करुन आधिकाधिक लोकांना जागृति देत रहा.

माझ्या या वाढदिवशी मला तुमच्याकडून हेच वचन हवे आहे.

इथल्या लोकांना जास्त कांही सांगण्याची जरुर नाहीं, इथल्या जीवनात अध्यात्मिकतेला मुळांतच महत्व आहे. आणि लोकांना त्यामधून होणाऱ्या उध्दाराची जाण व जिज्ञासा असते. हिमालयांत जाऊन तप करणें, समुद्रकाठीं चिंतन करणें, इतर धार्मिक कार्यक्रमाला नियमित जाणें, उपास - तापास करणें हे पूर्वीपासून चालत आले आहे. पण आतां हे करण्याची जरुरी नाही. सहजयोगात आल्या आल्याच ते पार होतात, व त्यांना सर्व आशीर्वाद मिळू शकतात. नवीन लोकांचा विश्वासच होत नाहीं की हे सर्व इतक्या सहजपणें व सुगम रीतीने कसे घडून येते. पण त्यांच्याकडे पाहून हजारोंनी लोक सहजयोगांत उतरतील. म्हणून इथें सहजयोग खूप पसरण्यासारखा आहे आणि इथल्या लोकांनी मनावर घेऊन प्रयत्न केले तर हे सहज शक्य आहे. तुमच्यापैकी प्रत्येकानें कमीत कमी शंभर लोकांना जागृति दिली तर सहजयोग खूप वाढेल. कुठेही गेलात तरी लोक सहजयोग स्वीकारायला उत्कुक असल्याचे तुम्हाला आढळून येईल. म्हणून माझी इच्छा आहे की तुम्ही लोक जोमाने कार्य करण्याच्या मागे लागा व प्रयत्न करत रहा. पुढच्या वर्षी या समारंभाला आजच्यापेक्षां दुप्पट लोक येतील अशी मी आशा करते. तुम्ही लोकांनी आज जो माझा आदर-सत्कार केला त्याबद्दल मी मनापासून धन्यवाद देते. पण पुन्हा एकदां सांगावेसे वाटते की तुम्ही प्रत्येकाने दरवर्षी कमीत कमी शंभर लोकांना जागृति द्या. भारतीयांचे हे कर्तव्य आहे व तुमच्या पाठीमागें माझे आशीर्वाद आहेत व हे कार्य होणारच आहे अशी निष्ठा बाळगा.

सर्वांना अनंत अनंत आशीर्वाद



# शिवरात्री पूजा

श्रीमाताजींचे प्रवचन

प्रतिष्ठान, १ मार्च २००३

शिवांचा भक्त होण्यासाठी राग वा नाराजीची भावना न बाळगता सहजयोग्यांनी सर्वांना क्षमा केली पाहिजे.

शिवाचा सर्वात मोठा गुण आहे क्षमा करणे. ते फार क्षमाशील आहेत. जर त्यांनी क्षमा केली नाही तर कोणीही वाचू शकणार नाही. त्यांच्या क्षमाशील स्वभावामुळेच आज आम्ही सर्वजण जगत आहोत, नाहीतर आपले काय झाले असते याची कल्पना करु शकत नाही. अशा महादेवांना 'आम्हाला आपल्या प्रमाणे क्षमाशील स्वभाव कृपा करुन द्या' असे आपण मागितले पाहिजे. त्यांच्या सारखे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या सारख्या शक्त्या फार दुर्मिळ. पण हे सर्व असूनसुध्दा ते अत्यंत क्षमाशील आहेत. तसेच आपण सर्व मानव आहोत हे समजून ते आपल्याला क्षमा करतात. त्यांचा क्षमेचा गुण आपण लोकांनी घेतला पाहिजे. परंतु आपल्यात या गोष्टीचा अभाव आहे. आपण लहान सहान गोष्टी घेऊन बसतो, लढाई, भांडणे करत बसतो क्षमा करीत नाही. असे असेल तर ही महादेवांची पूजा होऊ शकत नाही. महादेवांना जे मानतात त्यांनी जरी कुणी चुका केल्या तरीही सगळ्यांना क्षमा केली पाहिजे.

प्रत्येकात काहीना काही दोष असतातच. आपण दुसऱ्यांच्या दोषांकडे न पहाता आपण आपल्या दोषांकडे पहा आणि इतरांना त्यांच्या दोषांबद्दल क्षमा करा. महादेवांचा हाच फार मोठा गुण आहे की क्षमा करणे. तो गुण मानव जातीत मोठ्या प्रमाणात आहे. एक काळ असा होता की बरेच जण क्षमाशील होते. परंतु आता मला काय कळतच नाही की आता काय झाले आहे. लोक खूपच भांडखोर, लालची, स्वार्थी आणि बरेच काही आहेत. आणि ह्या गोष्टी करतात त्यांना आशीर्वाद मिळणार नाही. आपण जर महादेवांची पूजा करता, त्यांना आपले गुरु मानता तर त्यांचा क्षमा करण्याचा स्वभाव तुम्ही घेतला पाहिजे. त्यांच्याकडे इतक्या शक्त्या असून, ते कधीही कोणालाही नष्ट करु शकतील असे असूनदेखील ते आपल्या क्षमेच्या शक्तीचाच उपयोग करत असतात.

बरेच लोक शिवजींची पूजा करतात, त्यांची प्रार्थना करतात की, 'हे परमेश्वरा कृपया आम्हाला क्षमा करा', ते अत्यंत क्षमाशील आहेत, क्षमा करत राहणे ही त्यांची उदात्तता आहे, मोठेपण आहेच. लोकांना मात्र क्षमा करता येत नाही. ज्यांना क्षमा करता येत नाही ते सहजयोगी नाहीत. सहजयोग्यांचा पहिला गुण म्हणजे ह्दयापासून क्षमाशील असणे. ते आपल्याला कोणी वाईट वागणुक दिली, कोणी नावे ठेवले असल्या 'गोष्टींकडे पहात नाहीत. शिवजी क्षमेचे अथांग सागर आहेत. मग आपण देखील सगळ्यांना क्षमा करण्याचा गुण मिळवला पाहिजे. तरच आपल्यामध्ये महादेवांचा वास प्रस्थापित होऊ शकेल. मी पहाते आपल्याला राग चटकन येतो मात्र क्षमा करण्याचे विचार येत नाही. क्षमा करता आली पाहिजे. जर आपल्याला क्षमा करता आली नाही तर या जगात आपण जगूच शकत नाही. जरी जगलात तरी दुसऱ्यांना नाराज करुन, त्यांना दुःखी करुन. त्यामुळे तुम्ही नेहमी दुःखीच राहाता.

शिवजी नेहमी शांत असतात. मात्र एखादा राक्षसासारखा वागू लागला तर त्यांचा एक जरी डोळा त्यांनी उघडला तरी ते सर्व काही नष्ट करतील एवढी जबरदस्त शक्ति त्यांच्या जवळ आहे. त्यामुळेच ते क्षमेचे सागर आहेत. तुम्ही समजून घेतले पाहिजे की त्यांच्या एवढ्या शक्त्या असून देखील ते क्षमेच्या शक्तीचा वापर करण्यात जास्त सुख मानतात. जे लोक शिवजींची पूजा करतात त्यांनी आत्मपरिक्षण केले पाहिजे की, आपल्यात

क्षमाशीलता किती आहे, आपण किती जणांना क्षमा करु शकतो. खरे तर हाच त्याचा मापदंड आहे. मात्र आपल्या आतमध्ये तर राग भरुन आहे, नेहमी घुमसत असतो. आपल्याला असे वाटते की याला ठीक केले पाहिजे, पण आपण कोण आहात त्यांना ठीक करणारे ? प्रत्यक्ष शिवजी त्यांना ठीक करु शकत नाहीत त्यांना आपण कोण ठीक करणार? अशाप्रकारे आपल्या स्वत:बद्दल काहीही कल्पना करणे ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. क्षमेचा वापर केल्याने आपले ऱ्हदय मोठे होते, आपण उच्च स्थितीला पोहचू शकतो.

जीवनात अनेक गोष्टी आहेत. पण मला असे वाटते की माणसांना क्षमा करणे ही सर्वात चांगली गोष्ट आहे पण तीच त्याच्या दृष्टीने अत्यंत कठिण गोष्ट आहे. तो प्रत्येक गोष्टीत चिडतो, रागवतो, नाराज होतो. अशा प्रकारच्या नाराजीला काही अर्थ नाही. त्यात काही तथ्य नाही. या ठिकाणी आपल्याला प्रेमाची शक्ती मिळेल ज्यामुळे ती दुसऱ्यांना देता येऊन त्यांना आनंदी करता येते. मला अजूनही वाटते की आपण आता पार झालात, आपल्याला व्हायब्रेशन्स समजतात सर्व प्रकारे आपण ठीक झालो तरीही आपली लेव्हल बघितली तर आपल्यात क्षमाशीलता खूपच कमी आहे.ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. लहान सहान गोष्टीवरुन चिडणे , नाराज होणे हे महादेवांच्या भक्तांचे लक्षण नाही.जे महादेवांची भक्ती करतात त्यांच्या स्वभावात एक प्रकारची शांति दिसून येते, त्यांच्या चेहऱ्यावर कधीच नाराजी दिसत नाही अशी माणसे सर्वात जास्त क्षमाशील असतात. बऱ्याच अशा गोष्टी असतात की त्यात आपण न अडकता शक्य झाल्यास त्यांना क्षमा केली पाहिजे.हेच महादेवांच्या जीवनाचे तथ्य आहे.

आपल्याकडे फार मोठे साधू-संत होऊन गेले. तसेच आपल्याकडे अनेक परमेश्वरी अवतार होऊन गेलेत, मात्र आजही शिवजींना सारी दुनिया मानतात, पूजा करतात. त्याचे कारण म्हणजे ते अत्यंत क्षमाशील आहेत, हे त्यांचे खास रुप आहे. त्याशिवाय त्यांच्यात ज्या अनेक शक्त्या आहेत त्या आपल्याला ज्यावेळी आपण क्षमा करायला शिकू त्यावेळी प्राप्त होतील. आपल्याला जोपर्यंत दुसऱ्यांना क्षमा करता येत नाही तोपर्यंत आपण त्यांच्या पायापर्यंत देखील पोहचू शकणार नाही.जगात चुका तर होतच असतात, माणूस आहे तो चुकणारच. पण कोणालाही त्रास देणे हे महादेवांपासून दूर जाण्याचे लक्षण आहे, महादेवांनी मोठ्या राक्षसांना, गुन्हेगारांना माफ केले आहे यावरुन आपल्याला हे शिकले पाहिजे की प्रेमशक्ती काय असते. प्रेमशक्तीमुळे मनुष्य अत्यंत आनंदी राहू शकतो. जे क्षमाशील लोक असतात त्यांना राग येतच नाही.

जर आपल्याला क्षमा करायची आहे तर राग कशाला येऊ द्यायचा? अशा लोकांच्या चेहऱ्यावर सोज्वळ, प्रेमळ भाव दिसून येतो. तरी आपल्याला आपणच तपासून बघितले पाहिजे की, आपण किती क्षमा करतो, किती लोकांना क्षमा करु शकतो.

याबाबत इसामसींचे उदाहरण बघितले तर ज्यावेळी त्यांना क्रूसावर चढवत होते त्यावेळी त्यांनी परमेश्वराला प्रार्थना केली की, ' या लोकांना क्षमा करा कारण त्यांना कळत नाही ते काय करतायेत ते' हे त्यांनी महादेवांना सांगितले.इतका मोठा गुन्हा करत असून देखील त्यांना माफ केले. आपल्या ऱ्हदयानुसार तब्येतीनुसार आपल्यात क्षमा करण्याचे गुण असतात. मी पहाते की दिवसें -दिवस हा गुण कमी होत चालला आहे. जास्ततर सुडाची भावना नाहीतर नाराजी जास्त दिसते. अशा प्रकारे फारच चुकीच्या रस्त्यावर लोक चालले असून त्याला ते धर्म समजतात. ज्यात शिव नाही तो धर्म कसला? त्यामुळे आज आपण सर्वांनी प्रतिज्ञा केली पाहिजे की, आमच्या मनात ज्याच्याबद्दल काही ना काही राग, नाराजी असेल त्याला माफ केले पाहिजे. मी हे मानते की बऱ्याचशा अशा चुका असतात की त्या आपण माफ करु शकत नाही, विरोध करु शकत नाही. परंतु आपण जर शिवजींना मानत असाल तर शिवजी सहज क्षमा करतात कारण त्यांचे ऱ्हदय आपल्यापेक्षा खूप मोठे आहे.

त्यामुळे कुणाचाही अपमान करणे, कोणालाही कमी समजणे, ही चुकीची गोष्ट आहे. आपण कोण आहोत दुसऱ्यांचा अपमान करणारे? मनुष्य हे सर्व अहंकारातून करतो, ही सर्व अहंकाराची छाया आहे. शिवजी असे आहेत की त्यांच्यामध्ये जरासुध्दा अहंकार नाही. त्यांच्यात असलेल्या शक्तींची त्यांना माहिती असून देखील ते कधीच नाराज होत नाहीत. त्यांच्या जवळच्या शक्तीने ते कोणालाही क्षणात भस्म करु शकतील. त्यामुळे च ते नहमी सय्यमी असतात. खूप क्षमाशील राहतात. त्यामुळे आपणाला पण आज ठरवले पाहिजे की आम्ही कोणावर रागावणार नाही, सर्वांचे दोष काढीत बसणार नाही, पण आपले दोष तपासू. आपण जर सहजयोगी आहात तर दुसऱ्यांवर रागावणे हे महापाप आहे. आशा आहे आपण आत्तापासूनच शिवजींबद्दल या गोष्टी लक्षात ठेवाल आणि तसे वागाल.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.




# शिवपूजा पुणे २००३
## वृत्तांत

या वर्षाची शिवपूजा दिनांक १४ ते १६ मार्च २००३ या तीन दिवसात पुण्यातील बालेवाडी स्टेडियममध्ये संपन्न झाली. शिवपूजा पुण्यातील बालेवाडी स्टेडियममध्ये होण्याचे हे सलग चौथे वर्ष होते.

दिनांक १४ मार्च २००३

संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात रात्री ८ च्या सुमारास झाली. प्रथम श्री राजेंद्र पुगालिया यांनी आजच्या कार्यक्रमाबाबत माहिती दिली. संगीत कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर स्टेजसमोर बसलेल्या कलाकारांपैकी श्री सुब्रमण्यम यांनी गणराज रंगी नाचतो नाचतो, शंकर तेरी जटामे बहती है गंगाधारा, ही भजने सादर केली. श्री बागडदे आणि सहकारी यांनी जय अंबे कुंडलिनी माँ सुनलो गणेश पुकार, जय दुर्गे दुर्गति परिहारिणी शंभु विदारनी मात भवानी, हे आदि माँ हे अंती माँ, जे वांछिले ते तू दिले, नंतर डॉ. सिम्पल यांनी उठ जाग मुसाफिर घोर भये अब रैन कहा जो सोवत है, जब से तुने मुझे दिवाना बना रखा है संग हर सक्त में हातो मे उठा रखा है ही भजने सादर केली. त्याचवेळी श्रीमाताजींचे श्री नलगीरकर व श्री पुगालिया यांच्या सोबत स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी स्टेजच्या समोरच्या बाजूला श्रीमाताजींच्या स्वागतासाठी बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप या मिलीटरी संस्थेच्या पाईप बॅन्डने सुंदर धून वाजवून स्वागत केले.

श्रीमाताजीच्या सोबत श्रीवास्तव साहेबाचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजींचे हार घालून यथोचित स्वागत केले गेले. श्री नलगीरकर यांनी तीन दिवस होणाऱ्या शिवपूजा सोहळ्याचे उद्घाटन होत असल्याचे सांगून ऑर्गनायझर कमिटी व जगातून आलेल्या सर्व सहजयोग्यांचे स्वागत केले तसेच श्रीमाताजींनी शिवपूजा करण्यास परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. शिवपूजेसाठी आपली स्थिति सुधारण्यासाठी श्रीमाताजींनी अगोदरचे दोन दिवस संगीत प्रोग्राम ठेवले आहेत हेहि मुद्दाम सांगितले. यावरुन श्रीमाताजी आपली किती काळजी घेतात हे लक्षात येते. श्रीमाताजींनी तीन दिवस प्रोग्राम दिला त्याबद्दल सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्रीमाताजींचे तसेच सर श्री सी.पी.श्रीवास्तवसाहेब यांचे त्यांनी आभार मानले. यानंतर प्रत्यक्ष संगीत कार्यक्रमाला सुरवात झाली.

सुरुवातीला प्रसिध्द गायक श्री अजित कडकडे यांचे स्टेजवर आगमन झाले. श्री कडकडे हे पंडित जितेंद्र अभिषेकी व पंडित गोविंद प्रसाद जयपूर यांचे शिष्य. सुरवातीला त्यांनी, नमो शारदा देवी किजीए कृपा मोपे किजीए ध्यान ध्यान मोहे शारदा, तुम्हारी शरण मे जो कोई आवे कष्ट मीटे ओर मुक्ती पावे, मिले भक्ती और ग्यान, नाम तुझे बरवेगा शंकरा हर हर बरबेगा देवा शंकरा शंकरा शंकरा, कल रात सपनेमे मैने माँ को देखा भगवती को देखा निर्मल माँ को देखा, ब्रम्ह शोधिले ब्रम्हांड मिळाले आई तुझिया धामी, शेवटी ओ मैया निर्मल मैया मझधार मे मेरी नैया बन जावो तुम खिवय्या ही भजने सादर केली. त्यानंतर ११.३० च्या सुमारास हैद्राबादच्या के श्रीनिवासन आणि पार्टी फोक डान्स साठी स्टेजवर आले. सदर ग्रुपने सन १९८२ च्या एशीयाड मध्ये तसेच २६ जानेवारीला दिल्ली लाल किल्ल्यावर तसेच मुलांच्या फुटबॉलच्या उदघाटनाच्यावेळी कार्यक्रम केले होते. सदर ग्रुपमध्ये साधारण १५ मुलामुलींनी भाग घेतला होता. तसेच त्यांचा स्वतंत्र वाद्यवृंद होता. त्यांनी भारतातील वेगवेगळ्या प्रांतातील समूह- नृत्य सादर केले, त्यामध्ये मथारी-आंध्र प्रदेश, कोळी नृत्य- महाराष्ट्र, दांडीया- गुजराथ भांगडा - पंजाब इत्यादी प्रकार होते. तसेच कुचीपुडी मध्ये शिव पार्वती डान्समधून रौद्र रुप व प्रेमानंद रुप सादर करताना वेगवेगळ्या मुद्रा सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. तसेच आंध्र



प्रदेशात होळी- दिपावलीच्या वेळी होत असलेले लंबाडा नृत्य सादर केले. सदर कार्यक्रम सादर करताना कलाकारांना ड्रेपरी बदलण्यास जो वेळ लागत असे त्या मधल्या वेळात सुब्रमण्यम यांनी निर्मल माता निर्मल माता गाया करेंगे श्रीमाताजींके गुण हम गाया करेंगे, अमरावतीच्या गायकाने आई तुझ्या चरणीचा मी दास माझ्या ह्दयी तुझाच वास व ओम नमो शिवाय ओम नमो शिवाय तीनो शब्दमे सृष्टी सारी ही दोन अत्यंत सुंदर भजने सादर केली. रात्री दिडच्या च्या सुमारास कार्यक्रम संपला.

<u>१५.मार्च २००३</u>


सकाळी ६.३० वा सामुहिक ध्यानाने सुरवात झाली.त्यानंतर ११ च्या सुमारास सर्व लिडर्सची मिटींग श्री नलगीरकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. त्यानंतर संगीताचा प्रोग्राम झाला. त्यामध्ये डॉ सिंप्पल, डॉ राजेश, श्री धुमाळ व श्री बागडदे यांनी सहजयोगातील प्रसिध्द भजने म्हटली. संध्याकाळी कार्यक्रमाची सुरवात डॉ सिंम्पल यांनी तीन महामंत्रांनी केली. त्यानंतर त्यांनी गाई ये गणपती जगवंदन , शिवो हं शिवो हं शिवो हं वही आत्मा परमानंद मै हू ही भजने म्हटली. त्यानंतर श्री राजीव बागडदे आणि कंपनी यांचे ९ च्या सुमारास कव्वाली साठी स्टेजवर आगमन झाले. त्यांनी कबुल कि जो माँ निर्मल की बंदगी मैने ही नविन कव्वाली सादर केली. त्यानंतर हैद्राबादच्या आर.बी. गृप व्हायलीन वादनासाठी साधारण १०-१२ बाल कलाकाराच्या ताफ्यासह गृप प्रमुख श्री अशोक गुरजाले यांचे त्यांच्या मृदुंग, तबला व इतर वाद्यासह स्टेजवर आगमन झाले. त्यांनी आजपर्यत अनेक बक्षिसे घेतली असून आंध्र प्रदेशात हा गृप अत्यंत प्रसिध्द असल्याचे सांगीतले .त्यांनी सुरवातीला आंध्र प्रदेशातील प्रसिध्द गीत सादर केली. रात्री १० च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. त्यानंतर त्यांनी तुझ्या पुजनी अर्चनी लीन व्हावे, पावसाच्या आगमनाच्या आवाजाची धून, माँ तेरी जय हो तेरा ही विजय हो व शेवटी शिवोह शिवोह शिवोह शिवो हं हे गीत वाजवून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

त्यानंतर ११च्या सुमारास हैद्राबादचे प्रसिध्द कव्वाली गायक यांचे स्टेजवर आगमन झाले. बोल रहा है तनमन सारा माताजी सहजयोगींका हरदम नारा माताजी माता निर्मला माताजी या कव्वालीने सर्वांना अक्षरश: नाचविले. शेवटी ठुमरी राग भैरवी मध्ये सादर केली. बोल मै तो तोरे दामन ना लागी माता गाऊन रात्री दोन च्या सुमारास कार्यक्रम संपला.

<u>दि. १६मार्च २००३</u>

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ध्यानाने झाली. संध्याकाळी सुब्रम्हण्यम यांनी ७.१५ च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात तीन महामंत्रांनी केली.त्यानंतर गणेशा गणेशा श्रीमहागणेशा विनायका गणेशा विघ्नराजा गणेशा, दिपक वर्मा यांनी डम डम डम डम डमरु बजाये शिव शंकर कैलासपती , शंकर भोले भाले, डॉ राजेश यांनी शिव शंकर चले कैलास भोले बाबा चले कैलास ही भजने सादर केली. त्यानंतर साधारण आठच्या सुमारास प्रचंड फटाक्यांच्या आताष बाजीत श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. इटलीचे श्री विडो व श्री जलान यांनी श्रीमाताजींचे हार घालून स्वागत केले. त्यानंतर श्रीमाताजींनी सर्वांना अमृतवाणीमध्ये मार्गदर्शन केले.

प्रत्यक्ष पूजेला सुरवात झाली त्यावेळी पूजेतील गाणी - हेमजा सुतंम भजे गणेश नित्य नंदनम, डॉ राजेश यांनी- गणपती बाप्पा मोरया, श्री बागडदे यांनी गाईऐ गणपती जग वंदन गाईए गणपती जग वंदन



म्हटले. त्या नंतर आस्ट्रेलियन म्युझिक ग्रुपला श्री माताजींनी गायला बोलावले. त्यांनी सुरवातीला सांग सांग भोला नाथ जग सुखी होईल का? विश्व निर्मल धाम मध्ये सहजी मोक्ष घेतील का? ओम नमो शिवाय औम नमो शिवाय सहजी आपण होऊ या, ललाट पे है चंद्रमा चंद्रमा चंद्रमा जटामे गंगा धार है, डम डम डम डम डमरु बजे अरे भोले नाथ शिव शंभू नाचे ही भजने म्हटली, नंतर देवीच्या पूजेतील गाणी- या देवी सर्व भुतेषू, आदी शक्ती तेरे चरणमे हम आये है, सात जनम जो पुण्य किये है सफल हुये सारे, बोलो आदिशक्ती श्रीमाताजी श्रीनिर्मलादेवी की जय,पहेले नमन हो गणरायाला, विश्व वंदिता निर्मला माता, या भजनांच्या समवेत साधारण ११.३० च्या सुमारास पूजा पूर्ण होऊन आरती झाली. त्यानंतर संपूर्ण जगातून आलेल्या सहजयोग्यांचा श्री माताजींना सादर भेट अर्पण करण्याचा कार्यक्रम झाला. त्यामध्ये विशेष म्हणजे पाकिस्तानातून देखिल प्रेझेंट आले होते. रात्री १.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

यावेळच्या शिवपूजेची तयारी डिसेंबर पासूनच सुरु झाली होती. स्टेडियम मध्ये दरवर्षीपेक्षा या वर्षी परदेशीयांची संख्या जास्त दिसत होती. त्यांच्या सुखसोयींवर जास्त लक्ष देण्यात आले होते. त्यांची राहण्याची व्यवस्था स्टेडियम मधील इनडोअर बास्केटबॉल स्टेडियममध्ये केली होती. त्याच ठिकाणी त्यांच्या जेवणाची व इतर सोईची स्वतंत्र व्यवस्था केली होती. तसेच यावेळचे स्टेजचे डेकोरेशन हैद्राबादच्या कलाकारांनी फार भव्य प्रमाणात केले होते. त्यामध्ये प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा वापर करुन सोनेरी रंगात भव्य कमान, मागच्या बाजूला घंटा असलेले खांब, मध्ये भव्य अशी शिवपिंड होती. पिंडीवर आकर्षक विद्युत रोशनाई केली होती. त्यामुळे सदरचे डेकोरेशन अत्यंत आकर्षक दिसत होते. तसेच स्टेजवर सर्वत्र फुलांची अत्यंत मोहक सजावट केली होती. स्टेजच्या पुढच्या बाजूला उतारावर नैसर्गिक हिरवळ लावलेली होती. तसेच श्रीमाताजींच्या स्टेजवर जाण्याच्या मार्गावर कलकत्त्याच्या कलाकाराने नारळाचे झाड तसेच फुलांची आकर्षक सजावट केली होती.

पूजा संपन्न झाल्यानंतर सर्व सहजयोग्यांना थर्माकोलच्या आकर्षक पॅकेटमध्ये पॅकेट फुड देण्याची व्यवस्था केली होती तसेच सर्वांना श्रीमाताजींचे चरणामृत, कुंकू, पेढे, फुटाणे, गेरु असे एक पॅकेट वाटण्यात आले. प.पू. श्रीमाताजींच्या कृपेत भारतातील विविध प्रांतातील व विशेषत: पुण्यातील कार्यकर्त्यांनी श्री राजेंद्र पुगालिया यांच्या मार्गदशनाखाली मेहनतपूर्वक केलेल्या तयारीमुळे प्रचंड गर्दी असली तरीही शिवपूजा २००३ कार्यक्रम अत्यंत सुंदर प्रकारे पार पडला.





# लग्नाचा छप्पन्नवा वाढदिवस समारंभ वृत्तांत

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवी व सर सी.पी.श्रीवास्तव साहेब यांच्या लग्नाचा वाढदिवस समारंभ मुंबई मध्ये दिनांक ७ एप्रिल २००३ रोजी सोफिया कॉलेजच्या भाभा हॉलमध्ये अत्यंत दिमाखात पार पडला.सदर कार्यक्रमासाठी सर्व ठिकाणचे सहजयोगी प्रचंड प्रमाणावर येण्याच्या तयारीत होते. मात्र हॉलच्या क्षमतेचा विचार करता ठरावीक सगळीकडचे लिडर्स आणि कार्यकर्ते यांनाच निमंत्रण दिले होते.

कार्यक्रमाच्या ठिकाणचे वातावरण अत्यंत प्रसन्न होते. येणाऱ्या प्रत्येकास थंड दूध, कटलेट्स व स्वीट देऊन स्वागत करण्यात येत होते. तसेच प्रत्येकाला अत्तर लावून पुरुषांना गुलाबाचे फूल व स्त्रीयांना गजरा देऊन स्वागत करण्यात येत होते. कार्यक्रमाचा हॉल संपूर्ण वातानुकूलित होता. हॉलमधे प्रवेश केल्याबरोबर स्टेजवर आकर्षक डेकोरेशन केले होते. त्यात मधोमध छप्पन्न (56) हा इंग्रजीतील अकडा काढलेला होता; त्यातील पाच आकड्यामधे आकर्षक चंद्र व सहा आकड्यामधे सूर्याची प्रतिमा काढलेली होती. त्याभोवती सगळीकडे स्टार्स काढलेले होते. त्याच्या बाजूला दोन्हीकडे एक एक खलिता काढलेला होता त्यातील एकावर मराठीत -

चंद्र सूर्य अंतराळी तळपणे,
तुमचे हे असो भूवरी अनंत जगणे,
सहजी आम्ही प्रदीप्त तारे,
करुनी हा सोहळा जमुनी सारे,
दुसऱ्यावर हिंदीत-
प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवी, एव
सर श्री सी.पी.श्रीवास्तवजी को,
५६ वे विवाह वर्धापन समारोह के
शुभ अवसर पर सहजयोगी
परिवार की ओर से हार्दिक शुभकामनाये

कार्यक्रमाची सुरवात श्री निंबाळकर यांच्या भजनाने झाली. त्यांनी सुरवातीला आईच्या नामाचा गजर घेऊ दे, नंतर निर्मल नाम तु लेले मनवा निर्मल नाम तू लेले, निघाली निघाली दिंडी निघाली माझ्या निर्मल आईची, निर्मल बोलो आदिशक्ती बोलो निर्मल नाम का अमृत पिलो, तुझे रुप पाहूनिया मी दंग झालो ही भजनें सादर केली. त्यानंतर नाशिकचे धनंजय घुमाळ आणि सहकारी स्टेजवर आले , त्यांनी विजयी निर्मल शारदे विजयी निर्मल शारदे हे भजन म्हटले, नंतर सिंथेसायझरवर मधूर धून वाजवत असतानाच आठच्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. श्रीमाताजींना व सर सी.पी. श्रीवास्तव साहेबांना सात सुवासिनींनी ओवाळले. व श्रीमाताजींना व श्री सी.पी श्रीवास्तव साहेबांना हार अर्पण केले गेले.

कार्यक्रमाची सुरवात श्री दिवेकर यांच्या सुत्रसंचलनाच्या शेरशायरीने झाली. त्यांनी सात एप्रिल या दिवसाबाबत रामायणाचे महत्व सांगीतले त्यानुसार रामायणात या दिवशी अनेक महत्वाच्या घटना घडल्या.तसेच याच दिवशी प्रभू रामचंद्र व सीतामाई एकत्र भेटले. तसेच त्यांनी पुढील पंक्ती म्हणून वातावरण निर्मीती केली

श्रीमाताजी ....
उसको तो हमने नही देखा है कभी
पर इसकी जरुरत क्या होगी,
ऐ माँ तेरी सूरत से अलग,
भगवान की सूरत क्या होगी.

श्रीमाताजी व सरांच्या चरणावर लहान लहान मुलांनी देवदेवतांची रुपे धारण करुन फुले वाहिली ही कल्पना कलात्मक जाणवली. घुमाळ आणि सहकारी यांनी जगदंबेचा जोगवा मागते आई अंबेचा जोगवा मागते हा जोगवा गाऊन त्यांचा कार्यक्रम संपवला.

पदमश्री उस्ताद गुलाम मुस्तफा खान आणि सहकारी यांचे नंतर स्टेजवर आगमन झाले. त्यांनी लग्न समारंभात गातात तो राग शहारा-गुंठे लागी माँ फुलोका शेहरा हे भजन सादर केले . त्या नंतर जैसे फुल सुगंध समाले की धुंद प्रित तुम्हारी रोम रोम आन बसी निर्मला माता, गोपाल मेरी कारुण्य करो नही आवो, हरी बीन कोन है रे दुखमे प्रभु बीन कोन है रे दुखमे, मदन गोपाल शरण तेरे आयो, रे मन मुरख जन म गवाये कर अभिमान बिन रास लाझे शाम शरण नही आयो, बैठे सगुण माता, शाम हरी बोलो जी शाम हरी बोलो जी बोलो जी बोलोजी व शेवटी राम राम राम राम जय मीरा के गिरीधर लागत तुलसी दासके शाम या भैरवीने रात्री दहाच्या सुमारास कार्यक्रमाची सांगता केली. त्यानंतर वाढदिवसाचा केक कापण्यात आला. श्री सी.पी.सरांनी छोटेसे भाषण केले तसेच श्रीमाताजींनी छोटेसे भाषण केले त्यानंतर प्रेझेंटेशनचा कार्यक्रम झाला. श्रीमाताजी साडे अकराच्या सुमारास परत जाण्यास निघाल्या.

सर्वांसाठी अत्यंत उच्च प्रतीच्या डिनरची व्यवस्था केली होती. चैतन्याचा व डिनरचा आस्वाद घेऊन रात्री बारा च्या सुमारास या अनमोल सोहळ्याची सांगता झाली.





## लग्नाच्या वाढदिवस समारंभप्रसंगी सर सी.पी.श्रीवास्तव साहेबांचे भाषण (संक्षिप्त)

आमच्या लग्नाला ५६ वर्षे पुर्ण झाली. सदर काळ हा माझा स्वर्गीय आनंदाचा गेला. तिने माझ्या कठीण व अडचणीच्या वेळी मला मदत केली. तुमच्या श्रीमाताजी ह्या उत्तम बायको, चांगली आई, त्याचबरोबर चांगली अजी तसेच पणजी देखील आहे.

तिने मागील ५६ वर्षे माझी खाण्या-पिण्याची चांगली व्यवस्था पाहिली. तसेच माझी सतत काळजी घेतली. मी कामावरुन ज्यावेळी घरी येत असे त्यावेळी ती माझी काळजी घेत असे. तसेच आलेल्या सर्व नातेवाईकांना चांगल्या प्रकारे वागवत असे. तसेच नातेवाईकांमधे कधीच भेदभाव करीत नसे. स्वत:च्या मुलींप्रमाणे त्यांची काळजी घेत असे. तिने दोन्ही मुलींनादेखिल सारखेच वाढविले. स्टेजवर त्यातील कल्पना ही आमची मुलगी उपस्थित आहे. मागील ५६ वर्षे माझ्यासाठी जे तिने केले त्याबद्दल मी तिचा आभारी आहे. त्यापेक्षाही तिने जगासाठी जे कार्य केले त्याबद्दल मी श्रीमाताजींचा जास्त आभारी आहे.

जगामध्ये कोणी एक व्यक्ति करु शकणार नाही असे महान कार्य तिने केले आहे. तिने एक वेगळीच मानवजात निर्माण करण्याचे कार्य केले आहे. जगातील अज्ञानी, दुखी: भरकटलेल्या लोकांना एकत्र करुन त्यांना आनंदी केले. तसेच त्यांच्यात एक कुटुंब निर्माण केले. आपण जगाकडे पाहिले तर सगळीकडे अनेक समस्या आहेत. तुम्ही वर्तमनपत्रातील बातम्या वाचल्या तर सर्वत्र अडचणी आहेत. मात्र श्रीमाताजींनी निर्माण केलेल्या ह्या सहजयोग परिवाराच्या जगात मात्र कसलीच चिंता, दुख: नसून ते अत्यंत सुंदर असून त्यातील सर्वांचे भविष्य उज्वल आहे.

आजच्या या वाढदिवसाच्या निमीत्ताने तिने तुमच्याकडून जास्तीत जास्त सहजयोगी तयार करण्याची आपेक्षा बाळगली आहे. श्रीमाताजींनी नुकतेच सांगितले आहे की प्रत्येक सहजयोग्याने कमीत कमी १०० सहजयोगी तयार केले पाहिजेत. मी सांगतो हे केवळ बोलणे नसून आजच्या काळाची खरी गरज आहे. आज आपण मानवतावादी व्हायचे की विध्वंसक व्हायचे याचा विचार करण्याची आज वेळ आली आहे. सर्व जगाला एकत्र गुंफणारी एकमेव व्यक्ती ती आहे. तिने पुर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर एकत्र आणले. जगातील सर्व वर्णांचे, जातीचे, धर्मांचे लोक एकत्र आणले. आपण विचार केला तर हे केवळ एका व्यक्तीला शक्य आहे का? नाही. हे सर्व परमेश्वरी कार्य फक्त एकच व्यक्ती करु शकली ती म्हणजे ज्या आपल्या समोर आहेत त्या श्रीमाताजी. कोणी विचारले जगात दुसरा परमेश्वर आहे का?तर मी म्हणेन एकच परमेश्वर आहे तो म्हणजेच श्रीमाताजी.

दिल्लीच्या पुढील वर्षी होणाऱ्या कार्यक्रमाच्यावेळी लाखो लोक सहजयोगात आलेले असतील याची मला खात्री आहे. आजच्या या आपल्या प्रेमाबद्दल मी सर्वांचा अभारी आहे. हा आनंद सोहळा असाच चालत राहो. आपल्या सर्वांना जास्तीत जास्त आयुष्य लाभो. आपण सदर वाढदिवस १०० -२००-५०० वा साजरा करण्याचे भाग्य आपल्याला मिळो. सर्वांचा मी आभारी आहे.

## श्रीमाताजींचे भाषण (संक्षिप्त)

माझ्यावरील प्रेमापोटी आपण आज या कार्यक्रमाला उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपली आभारी आहे. मी काही केले नाही. मात्र ज्यांनी सहजयोग स्वीकारला त्यांची मी आभारी आहे. जगात सर्वात जास्त मोठी शक्ती ही प्रेमशक्ती आहे. ही प्रेमशक्ती मानवात उपजत असून त्याचा जर वापर केला तर तुमचे सर्व प्रश्न संपतील, तसेच नको असलेल्या गोष्टी तुम्ही विसरुन जाल. कारण प्रेमशक्ती ही परमेश्वराची शक्ती आहे. या ठिकाणी जर परमेश्वर हे पहात असेल तर यात काही विशेष नाही. कारण ज्या ठिकाणी प्रेमाने भारावलेले वातावरण असते त्या ठिकाणी परमेश्वराचे अस्तित्व असतेच. म्हणूनच सगळीकडे प्रेम पसरवणे आवश्यक आहे.

जगातील अनेक अडचणीत असलेले लोक सहजयोगातील या प्रेमशक्तीमुळे आनंदी, सुखी होऊ शकतात. जगातील कोणी कसाही असला तरीही ह्या प्रेमशक्तीला मिळवण्यास पात्र आहे. आपल्यापैकी कितीजणांना ही माझी प्रेमशक्ती समजली आहे मला माहित नाही. आपण सर्वांनी ही प्रेमशक्ती सगळीकडे पसरवली पाहिजे. आपल्यामध्ये एक अडचण असते की आपल्याला एकमेकांबद्दल प्रेमाने वागण्याचे जमत नाही.ते जर तुम्हाला जमले तर तुम्ही अत्यंत आनंदी होऊ शकाल. मी ह्याचा आनंद घेत असते. कुठल्याही गोष्टींचा त्रागा करु नका, त्रास करुन घेऊ नका तुम्ही फक्त एकमेकांबद्दल प्रेमाने वागून त्यातील आनंद लुटा.

आज जास्तीत जास्त लोकांनी ह्या प्रेमशक्तीचा वापर केला पाहिजे. जरी याबाबत आपल्याला अनुभव चांगला आलेला नसला तरीदेखील हा आनंद दुसऱ्यांना दिला पाहिजे आणि आपणही त्यातून आनंद घेतला पाहिजे. मी सतत हाच आनंद घेत असते; तुम्हीसुध्दा याचा आनंद घ्या. म्हणून मी सर्वांना परत एकदा सांगते की, तुम्ही प्रेमशक्तीचा सतत आनंद घेत जा आणि ती प्रेमशक्ती जगभर पसरवा

सर्वांना अनंत आशीर्वाद

# आदिशक्तीची शक्ती-पीठे



भारतामध्यें शक्तिची असंख्य जागृत स्थानें आहेत. त्यांना शक्तिपीठ असे संबोधतात. नानारुपांनी नांदणारी देवी- शक्ति मूलत: आदिशक्तीच आहे ही श्रध्दा भक्तांच्या भावविश्वात स्थिरावलेली आहे.

आदिशक्तीची पीठ कथा अशी सांगितली जाते की, आपला पिता दक्ष प्रजापती यानें यज्ञ प्रसंगी आपल्या पतीचा, कैलासनाथ शिवाचा, अपमान केल्याने शिवपत्नी सतीने यज्ञांत उडी घेऊन आत्मदहन केले. त्यामुळें क्रोधित होऊन शिवाने दक्ष यज्ञाचा विध्वंस केला आणि सतीचे शव हातावर घेऊन सैरा-वैरा भ्रमण केले. त्या भ्रमणांत सतीचे अवयव ज्या ज्या स्थानी गळून पडले त्या त्या ठिकाणी शक्तिपीठे निर्माण झाली. प.पू. श्रीमाताजींनीही ही कथा एका प्रवचनांत सांगितली आहे. याच एकात्मतेच्या सूत्रांत देवीभक्तांची श्रध्दा सामावलेली आहे.

आदिशक्तीच्या जागृत पीठांची संख्या साडे - तीन (औट) मानलेली आहे. व ही संकल्पना ओम काराच्या साडे-तीन मात्रांशी निगडित आहे. तुळजापूर, माहूर, कोल्हापूर आणि सप्तशृंगगिरी अशी ही चार पवित्र स्थानें महाराष्ट्रात आहेत हे आपले भाग्य.

एक पीठ ते तुळजापूर<br>
द्वितीय पीठ ते माहूर<br>
तृतीय पीठ ते कोल्हापूर<br>
अर्धे पीठ ते सप्तशृंगी ॥

ही शक्तिपीठे म्हणजे केवळ भौगोलिक स्थाने. एवढेच त्याचे महत्व नसून तेथील दृष्य रुपातील अव्यक्त शक्तीचे भान आपल्याला घडायला हवे. म्हणजेच युगायुगा मधून चैतन्याने भारुन टाकणारी त्यांच्यामागील प्रेरकता जाणवते.



## पहिले पीठ तुळजापूर

इथे रामवरदायिनी तुळजाभवानी नांदते आहे. तिच्या दर्शनाने पुराण-इतिहासामधील घटना-प्रसंगांची चित्रे आपल्या अंतर्दृष्टीपुढे उमटतात. सोलापूरच्या उत्तरेला अठ्ठावीस मैलांवर तुळजापूर आहे. ज्या उंचवट्यावर या देवीचे स्थान आहे त्याला 'यमुनाचल' असे म्हणतात. येथील देवीमुर्ति अष्टभुजा महिषासूर मर्दिनी आहे व तिच्या आठही हातांत शस्त्रे आहेत. 'रामवरदायिनी' हे नांव प्रथम संत एकनाथांनी त्यांच्या भावार्थ रामायणात वापरले आहे, व सीतेच्या अपहरणानंतर शोध घेत असलेल्या श्रीरामांना या भवानीमातेने दर्शन दिल्याचा उल्लेख केला आहे. तुळजाभवानी माता ही समर्थांची व शिवछत्रपतींचीही कुलस्वामिनी व त्यांच्या महाराष्ट्र राज्य स्थापन कार्याला तिचेच आशीर्वाद लाभले होते हा अलिकडचा इतिहास सांगतो. दुष्ट दानवांचा संहार करण्यासाठी तेजस्वी प्रेरणा देणारी ही शक्तिदेवता आहे.

## द्वितीय पीठ माहूर



माहूरची रेणूका हीच आदिमाता जगदंबा म्हणून गौरवली जाते. नांदेड जिल्ह्यातील पूर्व टोकाला आंध्र सीमेजवळ हे स्थान आहे. रेणुका म्हणजे पृथ्वी, मृदल अशा रेणूंनी बनलेले मातीचे वारुळ हे रेणुकेचे मूळप्रतीक आहे सकल सर्जन जिच्या गर्भातून घडते ती भूमी, अर्थात पृथ्वीचे लघुरुप असे हे प्रतिक म्हणजेच आदिमाता रुप आहे. श्रीसूक्तांत तिचाच महिमा गायिला गेला आहे. रेणुका पुराणांत परशुरामाची माता जमदग्नीची पत्नी म्हणून हीच प्रकट झाल्याचा उल्लेख आहे. तुळजाभवानीच्या महिषमर्दिनीरुपांतही 'रेणुका' या आदिरुपाच्या खुणा आढळतात.

## तृतीय पीठ कोल्हापूर

देवीभागवताच्या सप्तम स्कंधामधे 'कोल्हापूर महास्थानं यत्र लक्ष्मी सदा स्थिता' असा उल्लेख आहे. 'करवीरे महालक्ष्मी' असा उल्लेखही इतर पुराणांत आढळतो. शक्ति उपासकांच्या सांप्रदायांत हे क्षेत्र व त्यात विराजमान असलेली श्रीमहालक्ष्मी यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. गेल्या हजार - बाराशे वर्षांच्या काळांत अनेक राजकुळांनी तिचे वैभव वाढविण्यात रस घेतला. हे मंदीर अत्यंत भव्य आहे; कालमानानुसार बाह्य रचनेंत फेरफार होत गेले तरी मुख्य गाभारा व सभामंडप प्राचीन काळचेच आहेत. पुराणांत, पौराणिक ग्रंथात या





शक्तिस्थानाचे महात्म्य गायिले गेले आहेच. पण स्त्रियांच्या मुखातील ओव्यांमधे त्याचा मुक्त कंठाने समावेश आहे. उदा'' कोल्हापूर शहर, अवतीभवतीनं पानमळा... अवतीभवतीनं सोनार...अवतीभवतीनं तांबट, अवतीभवतीनं पटवेगार....अवतीभवतीनं हंडे, तुझ्या गस्तीला राजा हिंडे, अंबाबाई॥'' अशा ओव्या आजही त्याची साक्ष देतात. राजसत्तेने देवीसत्तेच्या आधारानेंच शासन करावे असेच जणू या ओवीतून सुचविल्यासारखे वाटते. ही महालक्ष्मी साक्षात् ब्रम्हरुपिणी आहे; विश्वाची जननी, पोषिणी आणि संहारिणी आहे अशी लोकमानसातही धारणा आहे.

अर्धे पीठ सप्तशृंगी

सप्तशृंगनिवासीनी भगवतीचे वास्तव्य म्हणून सप्तशृंग गडाचा गौरव केला जातो. हे स्थान नाशिक जिल्हांत सात शिखरे असलेल्या उंच डोंगरावर आहे. त्याला वणीचा डोंगर म्हणून ओळखतात. ही भगवतीदेवीही महिषासुरमर्दिनीच आहे; शेंदराने रंगवलेले तिचे रुप अत्यंत उग्र आहे, अठरा हातांत नाना विध शस्त्रे धारण केली आहेत. पुराणग्रंथात आणि संतवाङ्मयात तिचा महिमा परोपरीने गायिला गेला आहे. या डोंगरावर विपुल औषधी वनस्पति आहेत. नाथपंथीय संतांचे हे महाकेंद्र आहे. ज्ञानेश्वरांच्या तत्त्वचिंतनाची परमप्रेरणा हीच महाशक्ति आहे. 'सप्तशृंग महात्म्य' या नावांचे एक संस्कृत स्थलमहात्म्य आहे. ''अष्टादशाभुजा दुर्गा सिंह्यवाहनसंस्थिता। भक्तानकंपासंपूर्णा हृदयानंदवर्धिनी ॥'' असे वर्णन आहे. सप्तशृंगपर्वतावर 'गिरिजा' नावाचे एक पवित्र तीर्थ आहे, त्यांत स्नान करुन महिषमर्दिनी देवीची पूजा करावी असे म्हणतात. महिष नामक महादैत्याला व त्याच्या सर्व दुष्ट दैत्यांना वधून भगवतीने इथे निवास केला असे सांगतात. मुक्ताबाईच्या पश्चात, त्र्यंबकेश्वरी स्वत: समाधिस्त होण्यापूर्वी निवृत्तिनाथही सप्तशृंगगडावर गेले होते असा उल्लेख नामदेवांनी समाधी - प्रकरणांत केला आहे.

समस्त सहजयोग्यांनी या शक्तिपीठांचे आदरपूर्वक व श्रध्दायुक्त भावनेने दर्शन घेऊन चैतन्यवृध्दीचा आनंद मिळवावा.

॥ जय श्रीमाताजी ॥

# श्रीमाताजींचा वाढदिवस सोहळा

## दिनांक १८-२१ मार्च २००३, दिल्ली



२१ मार्च हा श्री माताजींचा जन्मदिन सर्व सहजयोग्याकरिता पवित्र व मंगल दिन.

श्री माजाजींच्या ८० व्या जन्मदिनाचा हा सोहळा दिनांक १८ मार्च ते २१ मार्च या काळात दिल्ली येथे मोठया उल्हासात पार पडला. परदेशी व भारतातील सहजयोगी या सोहळ्यात भाग घेण्यासाठी दिनांक १७ मार्चच्या संध्याकाळपासून दिल्लीतील 'निर्मलधाम ' या ठिकाणी जमू लागले. सर्व कार्यक्रमाची व राहण्याची व्यवस्था दिल्लीकरांनी खूप मेहनतीने कुठलीही कमतरता भासू न देता सर्व चोख ठेवली होती. विशेष म्हणजे समारंभाचा मुख्य हॉल रोज नवनवीन सजावटीने विशेषत: सुगंधी फुलांच्या माळांनी व पुष्परचनांनी केल्यामुळे कार्यक्रमचे चैतन्यमय वातावरण अधिक्य वृध्दिंगत झाले होते. वरील चार दिवस खालील प्रमाणे कार्यक्रम झाले.

सोहळ्याच्या मुख्य कार्यक्रमाची सुरवात दि. १८ मार्चच्या संध्याकाळी ७ वा. झाली. सुरवातीला हैद्राबादच्या सहजयोग्यांनी गणेशवंदना सादर केली, श्रीमाताजींवर रचलेले हॅपी बर्थ डे हे गाणे सादर केले. नॉयडा ग्रुपने नाशिकचा जोगवा सादर केला.त्यानंतर एक कुचिपुडी नृत्याचा कार्यक्रम झाला.त्यानंतर प्रसिध्द पखवाज वादक श्री संचितानंद स्वामी सोंधर यांनी आपल्या वैशिष्ट पूर्ण पखवाज वादनाने स्तुतिपर रचनांवर आधारित तालबध्द वादन प्रस्तुत केले.नंतर कु. शिला राऊळनगर हिने एक इंग्रजी भजन गायले.दिल्लीच्या सहजयोगी मुलींनी 'तुम आशा विश्वास ' हे गाणे गायले, दिल्ली युवाशक्तीने गंगावतरण ते निर्मलावतरण ही बॅले नृत्यावर आधारित नाटिका मोठ्या आकर्षक रीतीने सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. कार्यक्रमाची सांगता पुण्याच्या श्रीमती सावनी शेंडे यांच्या बहारदार गायनाने झाली. त्यांनी सुरवातीला शामकल्याण रागातील एक बंदिश नंतर मीरा भजन व शेवटी एक होरी सादर केली आणि कार्यक्रमाची सांगता केली.

दि. १९ मार्च च्या संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात परदेशी सहजयोग्यांच्या 'इन माय हार्ट ' या सुंदर भजनाने झाली.नंतर नॉयडा युवाशक्तीचे स्टेजवर आगमन झाले त्यांनी 'विश्वनिर्मल प्रेमाश्रमवर - अंतर्ध्वनी नामक एक वैशिष्ट्यपूर्ण नृत्य नाटिका सादर केली. नंतर ९.३० वा च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले त्यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.तसेच स्वागत गीत म्हणण्यात आले. त्यानंतर नाशिकच्या श्री धनंजय धुमाळ यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत सिंथेसायझरवर राग 'कौशिकरंजनी' सादर केला. नंतर निजामुद्दीन येथील कलाकारांनी कव्वालीचा कार्यक्रम केला. त्यात त्यांनी दोन कव्वाल्या सादर केल्या. नंतर स्टेजवर माधुरी मुदगल यांचे आगमन झाले त्यांनी ओडिसी नृत्याचे अत्यंत आकर्षक प्रकार सादर करुन सर्वांची वाहवा मिळवली. शेवटी प्रख्यात संगीतकार श्री रशीदखॉं यांचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी बसंत व सोहनी रागातील दोन बंदिशी गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. शेवटी त्यांनी होरी गाऊन कार्यक्रमाची सांगता केली.

दि. २० मार्च हा श्रीमाताजींच्या सत्कार समारंभाचा व आभार प्रदर्शनाचा दिवस.

श्रीमाताजींचे या दिवशी बरोबर संध्याकाळी ६.४५ वा सभामंडपात आगमन झाले. सुरवातीला परदेशी सहजयोग्यांनी ' अपने ि दिलमे सहजको बसाया करो' हे गाणे सादर केले. त्यानंतर वंदना वंदना सब करो वंदना हे भजन सादर केले. तोपर्यंत मंचावर श्री राहुल बजाज, भारताचे उपपंतप्रधान सौ व श्री एल.के.अडवाणी यांचे आगमन झाले. श्रीमाताजींना हार घालून त्यांच्या कार्याचा गौरवार्थ सत्कार करण्यात आला. त्यानंतर श्री अडवाणी व त्यांच्या पत्नीचा परिचय देऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्रसिध्द उद्योगपती श्री राहूल बजार यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर परदेशी सहजयोग्यांनी 'सात जनम जो पुण्य किये है सफल हुये सारे' हे भजन सादर केले.श्री राजेश शहा यांनी श्रीमाताजींच्या प्रती आदर व्यक्त करुन त्यांच्या महान कार्याचा गौरव केला.तसेच श्री व सौ अडवाणी यांच्या उपस्थितीबद्दल त्यांचे आभार

मानले.


. श्री अडवाणी यांनी आपल्या अल्प भाषणात श्रीमाताजींबद्दल आदर व्यक्त करुन त्यांना अभिवादन केले व आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या. त्यानंतर परदेशी सहजयोग्यांनी 'महालक्ष्मी नमोस्तुते' हे स्तोत्र सादर केले. त्यानंतर श्री ग्रेगवायर दिल्लीच्या मेयर सौ जयश्री पवार, डॉ वेल्स, देवू चौधरी, श्री गिडो यांनी आपल्या भाषणातून श्रीमाताजींचा सहजयोगदान त्यांचे लाभलेले आशिर्वाद व त्यांनी घडविलेले परिवर्तन, तसेच त्यांचे जगभरातील कार्य याचे कौतुक करुन श्रीमाताजींच्याप्रती आपले प्रेम व आदरभावना व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना श्रीमाताजींनी आपल्या भाषणात सहजयोग्यांना जो ईश्वरी प्रेमाचा प्रकाश मिळाला त्याचा त्यांनी अधिक अधिक उपयोग करावा व जास्तीत जास्त लोकांना आत्मसाक्षात्काराचा अनुभव देण्याचे आव्हान केले.


यानंतरच्या कार्यक्रमात हैद्राबादच्या प्रसिध्द कव्वाल यांनी आपल्या नेहमीच्या ढंगात कव्वाल्या सादर करुन सर्वांची वाहवा मिळविली. आजच्या कार्यक्रमाची सांगता प्रसिध्द सतारवादक श्री शहीर परवेझ यांच्या अत्यंत मोहक वादनाने झाली

दिनांक २१ मार्च हा श्रीमाताजींचा जन्म दिवस व पूजा सोहळा दिवस

आजच्या संध्याकाळच्या कार्यक्रमाची सुरवात भजन गायनाने झाली. श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन रात्री ९.३० च्या सुमारास झाले.त्यावेळी त्यांची पंचारती करुन व हार घालून स्वागत करण्यात आले.त्यानंतर श्रीमाताजींनी सर्व सहजयोग्यांना अमृतवाणीत मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी जगात शांती आणावयाची असेल तर जास्तीत जास्त लोकांना आत्मसाक्षात्कार देऊन सहजयोग वाढविणे आणि प्रत्येक सहजयोग्याने पुढील वर्षात १०० लोकांना आत्मसाक्षात्कार देण्याची अपेक्षा व्यक्त केली.

त्यानंतर लहान मुलांकडून श्रीमाताजींच्या चरणांची गणेशरुपात पूजा केली. पूजनानंतर सर्व सहजयोग्यांतर्फे व निरनिराळ्या देशातील सहजयोग्यांतर्फे जन्मदिवसाच्या शुभेच्छा व भेटी अर्पण केल्या हा सोहळा संपला त्यावेळी पहाटेचे चार वाजले होते.





# आज्ञा चक्र

आज्ञा चक्रासंबंधी प.पू. श्रीमाताजींनी वेळोवेळी केलेल्या उपदेशांमधील महत्त्वाचे सारांश:-

१) आपण सहजयोग्यांनी हे समजून घ्यायला पाहिजे की ख्रिस्तांचे अवतरण आज्ञाचक्र उघडण्यासाठी झाले जी एक फार अवघड गोष्ट आहे. हे चक्र फार आकुंचित चक्र आहे. ज्यावर ते आधिवृत आहे आणि ते म्हणतात तुम्ही स्वत:ला व दुसऱ्याला क्षमा केली पाहिजे. हा आज्ञाचक्राचा मंत्र आहे. बीजाक्षरात याला हं,क्षं म्हणतो, हं म्हणजे स्वत:ला क्षमा आणि क्षं म्हणजे दुसऱ्याला क्षमा. आज्ञाचक्र उघडण्यासाठी याच बीजाक्षरांचा उपयोग होतो. आज्ञाचक्र उघडण्याचा सोपा उपाय म्हणजे निर्विचार जाणीवेच्या स्थितीत येणे. या स्थितीमध्ये आज्ञाचक्र उघडते, ते उघडले नाही तर फारच वाईट. त्याचा तुम्हाला व इतरांना त्रास होतो. भूतबाधा झालेल्या लोकांना त्या बाधांची पकड आज्ञाचक्रावर येते आणि मग ते त्यांच्या डोक्यात शिरलेल्या दुष्ट वासनांच्या आहारी जातात.

२) देवी भागवता मधील वर्णनात महाविष्णु राधेचे पुत्र म्हणून सांगितले आणि तेच इसामसी हा (येशू)होय. त्यांचे दोन भाग होते. एक भाग श्रीगणेश आणि दुसरा इसामसी. तेच पुढे एकादशरुद्रामधील एक महाशक्ती जी ओमकाराची शक्ती होय. ज्यामुळे त्यांना मरण न येता त्यांचे पुनरुत्थान घडले. साक्षात प्रणव होते, ते या संसारात आले आणि संसारातूनच निघून गेले. साक्षात ते गणेश होते आणि त्यांना कोणीही ठार मारु शकत नव्हते. असा एकच अवतर परमेश्वराने पाठविला जो साक्षात प्रणव होता. त्याचे सुळावर चढणे हे केवळ आज्ञाचक्र उघडण्यासाठी होते. त्यांचा संदेश म्हणजेच 'पुनरुत्थान'. सहजयोगातही आपली जी शुध्द संकल्पना आहे ती म्हणजेच मातेने आपल्या हृदयात (गर्भात) धारण केले आणि आपल्या ब्रम्हरंध्रातून तुम्हाला जन्मास घातले. म्हणजेच आधीचे जे होते ते मृत पावते आणि नवीन जन्म होतो.

३) अहंकार आणि प्रतिअहंकार या दोन्हींच्या मधील स्थान आज्ञाचे जेथे पिट्युरी आणि पिनियल ग्रंथी दोघांचा सांभाळ करते. याच्या मधोमध जी सूक्ष्म जागा आहे तेच आज्ञाचे स्थान होय. ज्यावर वरील दोन्ही ग्रंथी कार्य करतात. या दोन्हींची सुरवात जरी विशुध्दी चक्रापासून सुरु होत असली तरी त्यांचे चलनवलन सांभाळ व स्टिअरिंग हे आज्ञाचक्रातूनच होते, ज्यावर साक्षात महागणेश व कालभैरव बसलेले आहेत. आणि समोर (पुढील)भागावर इसामसींचे स्थान आहे. इसामसी म्हणजे साक्षात महाविष्णू आणित्यांच्याबद्दल कृष्णांनी सांगून ठेवले आहे की मला या संसारात जे जे अर्पण केले जाईल त्यातील सोळावा भाग तुझ्यासाठी असेल आणि सर्व संसाराचे तुम्ही आधार बनाल व माझ्याही वरचे तुमचे स्थान असेल.

४) येशूचा हा असामान्य व महत्वाचा अवतार आपल्या उन्नतीकरिता झाला. त्यांनी स्वत:चे पुनरुत्थान घडविले नसते तर आपण आपल्या उत्क्रांतीला मुकलो असतो. ख्रिस्तांचे हे पुनरुत्थान तुमच्या स्व:च्या जीवनातही स्पष्ट आहे. तुम्ही आधी कसे होता आणि आता कसे आहात. किती बदल झालेला आहे, बराच फरक पडला, परिवर्तनही

झाले. त्यांचे क्रॉसवर झालेले बलिदान नंतर झालेले अनोखे पुनरुत्थान यामुळे तुमचा परिवर्तनाचा मार्ग मोकळा झाला. ते स्वत: शुध्द व पवित्र होते. त्यांचे पुनरुत्थान हे दुसरे काही नसून केवळ कायिक रुपांतर होते.

५) मानवप्राण्याच्या उत्थानामधील हा सर्वात मोठा अडथळा(मानसिक पातळीचा)त्यांनी दूर केला आणि आज्ञा चक्र उघडून देऊन मानवाला मानसिक पातळीवरुन पुढे येण्याचा मार्ग मोकळा केला, आपल्या मानसिक 'मी'पणातून बाहेर काढले. केवढे महान उपकार त्यांनी केले.

६) तो पुनरुत्थानाचा समय अथवा तपस्येचा त्यागाचा काळ होता. म्हणून महावीर आणि ख्रिस्त हे सर्वजण पूर्णपणे संन्यस्त झाले होते, ते मोठे तपस्येचे जीवन जगले. ते सर्व त्यांनी आपणासाठी केले. त्यांचेसाठी त्यांना करावयाचे नव्हते. परंतु आपणाला स्वच्छ करण्यासाठी त्यांना करणे आवश्यक होते आणि योग्य ती मेधा देण्यासाठी एकादश रुद्र स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांनी केले.

७) या सर्वांनी मानव जातीच्या उत्थानासाठी दिलेला सहभाग खूप उच्च आहे आणि ख्रिस्तांचा तर सर्वोच्च आहे. ज्यावेळी आपण ख्रिस्तांचे अनुकरण करावयाचे म्हणतो त्यावेळी आपण पाहिले पाहिजे की आपण किती अनासक्त आहोत.

८) आपणाला मनाच्या पलीकडे जायला हवे. यातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता तर आत्मपरिक्षण करा. परंतु हे फारच कठीण आहे कारण लोक स्वत:लाच खूप घाबरतात. त्यांना आत्मपरिक्षण करावयाचे नसते. त्यांना समजून येईल की ते किती पापी आहेत, कोणत्या चुकीच्या गोष्टी करताहेत. त्यामुळे ते स्वत:चाच द्वेष करतील. म्हणून त्यांना आत्मपरीक्षण नको वाटते. परंतु हे फारच महत्वाचे आहे की आत्मपरीक्षणातून आज्ञाचक्राचे हे दोन अडथळे (संस्कार, सवयी व अहंकार) पार करण्यासाठी आत्मपरीक्षण फार मदतीचे ठरते.

९) मी तुम्हांला या सर्व गोष्टी सांगत आहे, ज्या ख्रिस्त सांगू शकले नाही आणि त्याला(त्याच्या वचनामधून)काय अभिप्रेत होते ते पूर्ण करण्यासाठी ह्या सर्व गोष्टी तुम्हाला सांगत आहे. ते सर्व अगोदरच घडले आहे, तुम्हां सर्वांनाच आत्मसक्षात्कार मिळाला आहे. परंतु यानंतर इतरांचा सहजयोगी म्हणून आदर बाळगा, स्वत:बद्दल अफलातून कल्पना बाळगू नका. फक्त हे समजून घ्या की तुम्ही एक सहजयोगी आहात. आज ख्रिस्ताचा वाढदिवस साजरा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे ही समज असणे आवश्यक आहे.

१०)सहजयोगामधे अनेक प्रकारची प्रलोभने आणि त्यात जेव्हा अहंकार प्रबळ होतो तेव्हा आपल्याला हे समजत नाही की आपल्याला सहजयोगाकडे जायचे का सहजयोग्यांनी आपल्याकडे यायचे.बरेचसे लोक जेव्हा अहंकाराला आपल्या डोक्यावर चढवून ठेवतात तेव्हां ते सहजयोगाकडे पाठ करुन चालू लागतात आणि समजतात की सहजयोग्यांनी त्यांच्या मागोमाग गेले पाहिजे आपल्यावर अहंकाराचे आवरण असेपर्यंत आत्म्याचे दर्शन कधीच होणार नाही. अहंकाराशी लढून काही फायदा नाही. सहजयोगात अहंकाराशी लढायचे नसते मात्र त्याला समजून घ्यायचे असते. जसे तुम्ही स्वत:कडे बघू लागता तसा तुमचा अहंकार कमी होऊ लागतो आणि जसा अहंकार कमी होऊ लागतो तसा आपल्यामधील प्रकाश वाढू लागतो ●●●

# तानसेन (सन १४९३ ते १५८९)

एक श्रेष्ठ भारतीय गायक, संगीतक्षेत्रात अलौकीक अशा गणल्या गेलेल्या कलावंताबद्दल जितके चमत्कार आणि दंतकथा प्रचलित आहेत, त्या मानाने त्यांचे अधिकृत चरित्र असे कोठे नोंदले गेलेले नाही. त्यांचा जन्म वर्षे १५०६, १५२६ किंवा १५३१-३२ असेही दर्शविले जाते. तानसेनचे मूळ नाव रामतनू किंवा तन्नामित्र असे होते. ग्वाल्हेर जवळ बेहट या गावी त्याचा जन्म झाला. त्याचे वडील मकरंद पांडे हे ब्राम्हण, संस्कृत पंडित व उत्तम गायक होते. त्यांच्यामुळे त्यांना लहान वयातच गाण्याची गोडी लागली.

छोटा तन्ना मिश्र अतिशय कुशाग्र बुद्धीचा होता. त्याला बालवयातच एक ईश्वरदत्त देणगी लाभली होती. ती म्हणजे तो पशुपक्ष्यांच्या व इतरही वेगवेगळ्या आवाजांची हुबेहुब नक्कल करी. त्याच काळात वृंदावनातील एका अरण्यातल्या एका कुटीमध्ये संगीताचे महान अभ्यासक व थोर गायक स्वामी हरिदास वास्तव्यास होते. ते गानसाधना करत. रानावनाच्या त्या परिसरात त्यांचा संचार असे. एकदा तन्ना मिश्र राहत असलेल्या जंगलातून वाघाची डरकाळी त्यांच्या कानावर पडली. आजूबाजूला कुठेतरी प्रत्यक्ष वाघ आहे, असे स्वामीजींना वाटले. त्यांनी शोध घेतला असता त्यांना कळून चुकले, की ही खरीखुरी वाघाची डरकाळी नसून छोट्या तन्ना मिश्राने केलेली डरकाळीची हुबेहूब नक्कल आहे. त्यांना त्याचे फार नवल वाटले. त्यांनी लगेच त्या मुलाला जवळ बोलावले व प्रेमाने तो कोण, कुठला, कोणाचा मुलगा याची विचारपूस केली. मग तात्काळ त्यांनी मकरंद पांडे यांची भेट घेतली व त्यांच्याजवळ सरळ त्यांच्या मुलाचीच मागणी केली. ते म्हणाले, '' मी मुलाला चांगले सांभाळीन व त्याला संगीताचं उत्तम शिक्षण देईन'' संगीताचे परम उपासक असलेल्या पांडेजींना हे शब्द ऐकून आनंद झाला. स्वामी हरिदासांकडून आपल्या मुलाला संगीताचे धडे मिळणार, याहून दुसरा भाग्योदय कोणता असणार, असे त्यांना वाटले. त्यांनी आनंदाने आपल्या मुलाला स्वामीजींच्या पायावर घातले व त्यांच्या स्वाधीन केले.

पुढे दहा वर्षापर्यंत अतिशय परिश्रमपूर्वक व तन, मन अर्पण करुन तन्नाचे गुरुंची सेवा केली. त्यांच्या मौलिक दर्शनाखाली संगीताची अविरत उपासना केली व तो एक महान गायक होऊन वडिलांच्या भेटीस आला. वडिलांच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्यांचा लहानगा तन्ना मिश्र एक थोर गायक होऊन समोर उभा होता. पुढे ग्वाल्हेर येथे दरबारात राहिल्यावर आणि गायक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केल्यावर तो रीवा नरेश, रामचंद्र बाघेला यांच्या दरबारात गायक म्हणून राहिला. तेथून १५६२ च्या सुमारास तानसेन अकबर बादशाहाच्या दरबारात आला. अकबराच्या दरबारात येण्यापूर्वीच सर्वोच्च गायक म्हणून त्याची ख्याती पसरलेली होती. अकबराने त्याला विशेष सन्मान देऊन संगीतसम्राट तानसेन म्हणून गौरविले आणि आपल्या दरबारी नवरत्नांमधे त्यास स्थान दिले. पुढे तानसेन हा संगीतक्षेत्रातील एक अद्भूत चमत्कार म्हणून ख्याती पावला. तानसेन हा धृपदगायक होता. शिवाय त्याने स्वत: रचलेली अनेक धृपदेही प्रसिध्द आहेत. रागकल्पद्रुम या ग्रंथात अनेक धृपदे आढळतात. त्याने व्रज भाषेत आपली पद्यरचना केली.

तानसेनला दोन बायका असून सुरतसेन, सरतसेन, सरस्वती ही हिंदू पत्नीची मुले आणि तानतरंगखाँ व बिलासखाँ ही हुसेनीनामक मुस्लिम उपपत्निचीमुले असे समजले जाते. सरस्वतीचा विवाह मिश्रीसिंह नावाच्या बीनकराबरोबर झाला आणि मुलीकडूनच त्याचा वीनकरांचा वंश 'सेनिया' म्हणून प्रसिध्दीस आला. मुलाकडूनची सेनिया परंपरा रामपूरची असून हे कलावंत धृपद गायक होते. तानसेनने स्वत: अनेक नवीन रागांची निर्मिती केली असून ' मिया की तोडी ', ' मिया की मल्हार ', दरबारी कानडा, ' मियॉं की सारंग ' वगैरे राग तानसेनची निर्मीती म्हणून मानले जातात. दीपक राग गाऊन अग्नी प्रज्वलित करणे, मल्हार गाऊन पाऊस पाडणे, तोडी गाऊन हरणे बोलावण, वैजूबावराशी स्पर्धा, ' तानारिरि ' चा प्रसंग वगैरे अनेक चमत्कृतीपूर्ण अख्यायिका तानसेनच्या जीवनाशी जोडल्या जातात. सुप्रसिध्द वैष्णव संत गोविंदस्वामी यांच्या बरोबरच्या आख्यायिकाही प्रचलित आहेत. संत सूरदास आणि पंडित जगन्नाथराम हे देखिल तानसेनची धृपद गायकी ही 'गौडी', गोहरबानी, म्हणून समजली जाते. संगीत सार व रागमाला हे दोन ग्रंथ त्यांच्या नावावर दाखवले जातात. अबुल फज्लने अकबरनाम्यात तानसेनाचे वर्णन 'असा कलावंत हजार वर्षात झाला नाही' असे केले आहे. तानसेनची समाधी ग्वाल्हेर येथे मुहंमद घौस या अवलियाच्या दर्ग्याजवळ दाखवली जाते. त्या ठिकाणी दर वर्षी तानसेन पुण्यतिथीला मोठा जलसा भरवला जातो व त्यात अनेक नामवंत गायकआपली सेवा रुजू करतात.


तानसेन होऊन गेल्याला अनेक शतके लोटली. त्याच्या कीर्तीचा सुगंध आजही दरवळतो आहे व अजूनही पुढे शतकानुशतके तो तसाच दरवळत राहील.

# सहज समाचार

दिनांक १३ एप्रिल २००३ रोजी कराड येथे श्रीमाताजी निर्मलादेवींच्या ८० व्या वाढदिवसा निमित्त गावातून दिंडी काढण्यात आली होती. कराडमधिल शिवाजी हौसिंग सोसायटीमधून दिंडीचा प्रारंभ झाला.त्यानंतर कृष्णा नाका, चावडी चौक, मुख्य बाजार पेठेने यशवंत हायस्कूल येथे या दिंडीची सांगता झाली.

दिंडीमध्ये श्रीमाताजींच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली होती. त्यात कराडसह महाराष्ट्रातील सर्व भागातील सहजयोगी सहभागी झाले होते. दिंडीची सांगता पब्लिक प्रोग्रामने झाली. त्यावेळी प्रा.पवार,श्री कुंभोजकर व प्रा. चव्हाण यांनी माहिती दिली व जागृतीचा कार्यक्रम झाला.





दिनांक २० एप्रिल २००३ रोजी पुण्याजवळील उत्तमनगर येथिल न्यु कोपरे या गावी संध्याकाळी ६.३० च्या सुमारास मराठी शाळेच्या मैदानात पब्लिक प्रोग्राम झाला. कार्यक्रमाची सुरवात श्री बागडदे आणि ग्रुप यांच्या भजनाने झाली. त्यानंतर पुणे जिल्हा सहजयोग प्रमुख श्री राजेंद्र पुगालिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर श्री निंबाळकर यांनी प्रास्ताविक करुन कार्यक्रमाची सुरवात केली. नगर जिल्हातील श्री पवार यांनी सहजयोगाची माहिती दिली. प्रा. श्री चव्हाण यांनी श्रीमाताजींच्या कृपेत सर्वांना जागृति दिली.








शिवरात्री पूजा, प्रतिष्ठान, पुणे





वाढदिवस पूजा,
दिल्ली



वाढदिवस पूजा प्रसंगी भारताचे उपपंतप्रधान श्री व सौ अडवानी

## शिव पूजा, पूणे









## वाढदिवस पूजा, दिल्ली





